मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ | अंक : २७६ | शुक्रवार, १९ जून २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514

# बसस्थानक परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाईचा सकारात्मक परिणाम !

## १५ दिवसात एसटीच्या उत्पन्नात 43 कोटी 83 लाखांची वाढ

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या सूचनेनुसार आणि तत्कालीन औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करत राज्यभरातील बसस्थानकांच्या200 मीटर परिघातील अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी श्रीमती प्रियांका नारनवरे यांच्या नेतृत्वाखाली विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेला उल्लेखनीय यश मिळाले असून त्याचा थेट सकारात्मक परिणाम एसटी महामंडळाच्या उत्पन्नावर दिसून आला आहे.

1 जून ते15 जून 2026 या कालावधीत एसटी महामंडळाचे एकूण वाहतूक उत्पन्न 495कोटी34 लाख रुपये इतके झाले असून, मागील वर्षीच्या याच कालावधीतील 451 कोटी 51 लाख रुपयांच्या तुलनेत 43 कोटी 83 लाख रुपयांची (9.71टक्के) वाढ नोंदविण्यात आली आहे. म्हणजे दररोज चे सरासरी उत्पन्न 3कोटी रुपयांनी वाढले आहे.

या कालावधीत रायगड (2कोटी17 लाख), पुणे (5कोटी 97लाख), सातारा (3कोटी 46 लाख), छत्रपती संभाजीनगर (2कोटी 66 लाख), अमरावती (1कोटी 60 लाख) नांदेड (2कोटी 27 लाख) या विभागांनी सर्वाधिक उत्पन्नवाढ नोंदवली.परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, बसस्थानक परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एसटीच्या प्रवासी संख्येवर आणि महसुलावर मोठा परिणाम होत होता. न्यायालयाच्या आदेशानुसार बसस्थानकापासून २०० मीटर परिसरात अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. परिवहन विभाग, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलीस आणि एसटी प्रशासन यांच्या संयुक्त कारवाईमुळे प्रवाशांचा एसटीकडे ओढा वाढला असून त्याचे प्रतिबिंब उत्पन्नवाढीत स्पष्टपणे दिसून येत आहे.

सरनाईक यांनी पुढे सांगितले की, राज्यातील प्रत्येक बसस्थानक परिसर अवैध प्रवासी वाहतुकीपासून मुक्त करण्यासाठी ही मोहीम



अधिक तीव्र करण्यात येणार असून, एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी अशा कारवाया सातत्याने सुरू राहतील. प्रवाशांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि कायदेशीर सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्राधान्य आहे.

यश मिळाले असून त्याचा थेट सकारात्मक परिणाम एसटी महामंडळाच्या उत्पन्नावर दिसून आला आहे.1 जून ते15 जून 2026 या कालावधीत एसटी महामंडळाचे एकूण वाहतूक उत्पन्न 495कोटी34 लाख रुपये इतके झाले असून, मागील वर्षीच्या याच कालावधीतील 451 कोटी 51 लाख रुपयांच्या तुलनेत 43 कोटी 83 लाख रुपयांची (9.71टक्के) वाढ नोंदविण्यात आली आहे. म्हणजे दररोज चे सरासरी उत्पन्न 3कोटी रुपयांनी वाढले आहे.

या कालावधीत रायगड (2कोटी17 लाख), पुणे (5कोटी 97लाख), सातारा (3कोटी 46 लाख), छत्रपती संभाजीनगर (2कोटी 66 लाख), अमरावती (1कोटी 60 लाख) नांदेड (2कोटी 27 लाख) या विभागांनी सर्वाधिक उत्पन्नवाढ नोंदवली.परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, बसस्थानक परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एसटीच्या प्रवासी संख्येवर आणि महसुलावर मोठा परिणाम होत होता. न्यायालयाच्या आदेशानुसार बसस्थानकापासून २०० मीटर परिसरात अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. परिवहन विभाग, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलीस आणि एसटी प्रशासन यांच्या संयुक्त कारवाईमुळे प्रवाशांचा एसटीकडे ओढा वाढला असून त्याचे प्रतिबिंब उत्पन्नवाढीत स्पष्टपणे दिसून येत आहे. सरनाईक यांनी पुढे सांगितले की, राज्यातील प्रत्येक बसस्थानक परिसर अवैध प्रवासी वाहतुकीपासून मुक्त करण्यासाठी ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असून, एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी अशा कारवाया सातत्याने सुरू राहतील.

प्रवाशांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि कायदेशीर सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्राधान्य आहे.

# कुंडेवहाळ येथील जमीन संपादन सर्वेक्षणाला शेतकऱ्यांचा विरोध

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** कुंडेवहाळ येथील जमीन भूसंपादन सर्वेक्षणाला गुरुवार 18 जून रोजी शेतकऱ्यांनी विरोध केला. यावेळी भूमापन अधिकारी आणि सिडको अधिकाऱ्यांना सर्वेक्षण न करताच परत जावे लागले. कुंडेवहाळ, माणघर आणि इतर गावातील काही जागा भूसंपादित केली जाणार आहे. यासाठी 18 जून रोजी भूमि अभिलेखचे अधिकारी आणि सिडकोचे अधिकारी जागेची सर्वेक्षण करण्यासाठी आले होते. मात्र या जागेचा मोबदला शेतकऱ्यांना किती मिळेल आणि जागा कशासाठी भूसंपादन करण्यात येणार आहे याची माहिती मिळाल्याशिवाय मोजणी करून देणार नाही असा पवित्रा येथील शेतकऱ्यांनी घेतला. तसेच कोणत्याही प्रकल्पासाठी जमीन घेतेवेळी शेतकऱ्यांची संमती घेणे आवश्यक असते तसेच शेतकऱ्यांना काय मोबदला मिळणार याची माहिती देणे आवश्यक आहे. मात्र शेतकऱ्यांचे संमती आणि योग्य नुकसान



भरपाई व पुनर्वसनाची हमी मिळाल्याशिवाय कोणतेही भूसंपादन मान्य नसल्याची ठाम भूमिका येथील शेतकऱ्यांनी मांडली. शेतकऱ्यांच्या हरकती व सूचना विचारात न घेता भूसंपादनाची प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. यापूर्वीचा पनवेल आणि उरण परिसरातील अनेक गावांमध्ये भूसंपादन प्रक्रिये बाबत तीव्र नाराजी आहे.

त्यामुळे पारदर्शक आणि न्याय पद्धतीने प्रक्रिया राबविण्यात यावी अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. यावेळी दिबा पाटील यांच्या नावाच्या घोषणा देण्यात आल्या. ग्रामस्थांच्या तीव्र विरोधामुळे सर्वेक्षण तात्पुरते थांबवण्यात आले.

# पाटोदा बस स्थानकाचा कायापालट; काँक्रिटीकरण, संरक्षण भिंत व प्रकाश व्यवस्थेमुळे परिसर झळाळला

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा(प्रतिनिधी):** पाटोदा शहरातील बस स्थानक परिसरात करण्यात आलेल्या काँक्रिटीकरण, संरक्षण भिंत, ड्रेनेज व आधुनिक प्रकाश व्यवस्था या विकासकामांमुळे बस स्थानकाचा संपूर्ण कायापालट झाला असून परिसराला नवी झळाळी प्राप्त झाली आहे. प्रवासी, व्यापारी व नागरिकांकडून या विकासकामांचे सर्वत्र कौतुक होत आहे. पावसाळ्यात चिखल, पाणीसाठा व अस्वच्छतेमुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत होते. मात्र नव्याने करण्यात आलेल्या विकासकामांमुळे या समस्या मोठ्या प्रमाणात दूर झाल्या असून बस स्थानक परिसर आता अधिक स्वच्छ, सुरक्षित व आकर्षक दिसू लागला आहे. पाटोदा बस स्थानकाच्या विकासासाठी परिवहन विभागाकडून निधी उपलब्ध करण्यात आला. आमदार सुरेश आण्णा



धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे तसेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मंजुरीनंतर या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली. त्या नंतर कामाला गती देण्यात आली आणि साबीर कन्स्ट्रक्शन, पाटोदा यांनी निर्धारित कालावधीत दर्जेदार पद्धतीने काम पूर्ण केले. या विकासकामात बस स्थानक परिसराचे संपूर्ण काँक्रिटीकरण, मजबूत संरक्षण भिंतीचे बांधकाम, पावसाच्या पाण्याचा सुरळीत निचरा होण्यासाठी ड्रेनेज व्यवस्था तसेच आधुनिक प्रकाश व्यवस्था उभारण्यात आली आहे. त्या मुळे परिसराच्या सौंदर्यात भर पडली असून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. संरक्षण भिंतीमुळे बस स्थानक परिसर अधिक सुरक्षित झाला असून परिसराचे सौंदर्यही खुलले आहे. आधुनिक प्रकाश व्यवस्थेमुळे रात्रीच्या वेळी संपूर्ण परिसर उजळून निघत असल्याने प्रवाशांमध्ये सुरक्षिततेची भावना वाढली आहे. स्थानिक नागरिक, व्यापारी व नियमित प्रवाशांनी या विकासकामांचे कौतुक करत समाधान व्यक्त केले आहे. "बस स्थानकाचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलला असून आता परिसर आधुनिक आणि सुबक दिसत आहे" अशा प्रतिक्रिया

**आमदार सुरेश आण्णा धस यांच्या प्रयत्नातून मंजुरी, साबीर कन्स्ट्रक्शन, पाटोदा यांच्या गुणवत्तापूर्ण कामातून बस स्थानकाला आधुनिक रूप**

नागरिकांकडून व्यक्त होत आहेत. विकासकामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण केल्याबद्दल संबंधित यंत्रणा आणि साबीर कन्स्ट्रक्शन, पाटोदा यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. पाटोदा शहराच्या विकासाच्या दृष्टीने हे काम महत्त्वपूर्ण ठरत असून भविष्यात बस स्थानक परिसरात आणखी आवश्यक सुविधांची भर पडावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# सीएसआर निधीच्या प्रभावी वापरासाठी राज्यात 'स्टेट सीएसआर कक्ष' स्थापन होणार ; स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी बिनव्याजी कर्ज योजनेचाही विचार

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** महाराष्ट्र राज्याला देशातील सर्वाधिक सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधी प्राप्त होत असल्याने या निधीचा अधिक प्रभावी आणि पारदर्शक वापर करण्यासाठी राज्यस्तरावर 'स्टेट सीएसआर कक्ष' स्थापन करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. वर्षा निवासस्थानी सहाव्या वित्त आयोगासंदर्भात आयोजित सादरीकरण बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, राज्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांना सीएसआर निधीचा अधिकाधिक लाभ मिळवून देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. या माध्यमातून स्थानिक विकासकामांसाठी उपलब्ध



होणाऱ्या निधीचे नियोजनबद्ध वितरण आणि प्रभावी विनियोग करता येईल.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्र शासनाच्या बिनव्याजी कर्ज योजनेच्या धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीही विशेष बिनव्याजी कर्ज योजना तयार करण्याची सूचना केली. या योजनेअंतर्गत विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याच्या शक्यतांचा अभ्यास करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

बैठकीत ग्रामीण व निमशहरी भागातील बांधकाम व्यवस्थापनावरही सविस्तर चर्चा झाली. गावठाण हद्दीबाहेर असलेल्या लगतच्या बांधकामांना परवानगी देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना विशिष्ट अधिकार देण्याची व्यवस्था उभारावी, मात्र या अधिकारांचा गैरवापर होणार नाही यासाठी डिजिटल प्रणाली विकसित करावी, असे मुख्यमंत्री म्हणाले. तसेच निमशहरी भागांमध्ये ग्रामपंचायत हद्दीबाहेरील अवैध बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रातील सर्व मालमत्तांचे नकाशा योजनेद्वारे डिजिटल मॅपिंग करण्याचे निर्देश दिले. याशिवाय केंद्र सरकारच्या 'स्वामित्व' योजनेचा विस्तार करून गावठाण हद्दीबाहेरील मालमत्तांनाही या योजनेचा लाभ देण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

सहाव्या वित्त आयोगाच्या एकूण ४२ शिफारशींवर या बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक क्षमता वाढविणे, महसूल स्रोत मजबूत करणे आणि विकासकामांना गती देण्यासाठी विविध उपाययोजनांवर विचारमंथन करण्यात आले.

बैठकीस वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अप्पर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, अप्पर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, अप्पर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) विनिता वेद सिंगल, सचिव (नियोजन) शैला ए. तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी अप्पर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) विकास चंद्र रस्तोगी यांनी सहाव्या वित्त आयोगासंदर्भातील सादरीकरण केले.

# खोदलेल्या रस्त्यांवर टाकली खडी, नागरिकांचे हाल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी:** नवीन पनवेल शहरात खोदलेल्या रस्त्यांवर खडी टाकल्याने नागरिकांना आणि प्रवाशांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. खडीमुळे रस्त्यावरून वाहन चालवताना घसरण्याचा धोका वाढला आहे. याचा विशेष करून दुचाकी चालकांना त्रास होत आहे.दोन दिवसांपूर्वी या खोदलेल्या रस्त्यातील खडी मध्ये एक टेम्पोचे पुढील चाक अडकले होते. नागरिकांनी केलेल्या मदतीनंतर ते बाहेर काढण्यात आले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या खडीमिश्रीत रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी केली जात आहे. स्थानिक



नागरिकांनी महापालिकेकडे वारंवार तक्रारी करून देखील कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात आली नसल्याचा आरोप केला जात आहे.

रस्त्यावर टाकण्यात आलेले या मोठ्या खडीमुळे छोटे मोठे अपघात होत आहेत.

याचा त्रास पादचारी, जेष्ठ नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांना देखील होत आहे.

# एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाची वाढती ताकद; ऑपरेशन टायगर ठरले गेमचेंजर



**केतन भोज, घाटकोपर :** महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेले "ऑपरेशन टायगर" अखेर यशस्वी झाल्याची चर्चा जोर धरत आहे.उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील सहा खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन केल्याने राज्यातील राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे.या घडामोडींमुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.मंगळवारी रात्री घडलेल्या नाट्यमय घडामोडींमध्ये खासदार संजय जाधव,संजय देशमुख,नागेश पाटील आष्टीकर,ओमराजे निंबाळकर,भाऊसाहेब वाकचौरे आणि संजय दिना पाटील यांनी दिल्ली गाठून स्वतंत्र गट स्थापन करण्याची प्रक्रिया पूर्ण केल्याची माहिती समोर आली.लोकसभा अध्यक्षांनी या गटाला मान्यता दिल्याने या राजकीय घडामोडींना अधिकृत स्वरूप प्राप्त झाले आहे.एकनाथ शिंदे यांनी २०२२ मध्ये घेतलेली भूमिका ही केवळ सत्तेसाठी नसून,हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाच्या विचारांना न्याय देण्यासाठी असल्याचे ते सातत्याने सांगत आले आहेत. त्यानंतर अनेक आमदार आणि खासदारांनी शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला. आता या सहा खासदारांच्या निर्णयामुळे शिंदे यांच्या नेतृत्वावरील विश्वास आणखी दृढ झाल्याचे दिसून येत आहे. राजकारणात विचार आणि नेतृत्व यांना मोठे महत्त्व असते. कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधी ज्या नेतृत्वाकडून स्पष्ट भूमिका,विकासाची दिशा आणि



संघटनात्मक बळ अपेक्षित करतात,त्या निकषांवर एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व प्रभावी ठरत असल्याचे समर्थकांचे मत आहे.केंद्रातील नेतृत्वासोबतचा समन्वय,महाराष्ट्रातील विकास प्रकल्पांना मिळालेली गती आणि जनसामान्यांच्या प्रश्नांवर घेतलेली भूमिका यामुळे शिंदे यांची राजकीय स्वीकारार्हता वाढल्याचेही बोलले जात आहे.या घडामोडी केवळ पक्षीय राजकारणापुरत्या मर्यादित नसून,महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या पर्वाची सुरुवात मानली जात आहेत. बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्व,विकास आणि जनतेशी थेट नाळ जोडणारे राजकारण पुढे नेण्याचा प्रयत्न उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे करत असल्याचा दावा त्यांच्या समर्थकांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे,या घडामोडींना अधिक बळ देणारी बाब म्हणजे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने बोलावलेल्या महत्त्वाच्या बैठकीसाठी सर्व खासदारांना व्हिप बजावण्यात आला असतानाही संबंधित सहाही खासदार बैठकीला उपस्थित राहिले नाहीत.त्यामुळे ते उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वापासून दूर गेल्याचे संकेत आधीच मिळाले होते. त्यानंतर स्वतंत्र गट स्थापन करण्याच्या हालचालींना वेग आला आणि अखेर चित्र पूर्णपणे स्पष्ट झाले.खासदार संजय जाधव, संजय देशमुख,नागेश पाटील आष्टीकर,ओमराजे निंबाळकर,भाऊसाहेब वाकचौरे आणि संजय दिना पाटील यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे उद्धव ठाकरे यांना पुन्हा एकदा मोठा राजकीय धक्का बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.लोकसभा अध्यक्षांकडून स्वतंत्र गटाला मान्यता मिळाल्यानंतर या निर्णयाला अधिकृत स्वरूप प्राप्त झाले असून,शिवसेनेतील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल झाल्याचे स्पष्ट झाले आहे.या सर्व घडामोडींमुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाची ताकद,संघटनात्मक क्षमता आणि पक्षातील वाढता प्रभाव पुन्हा अधोरेखित झाला आहे. अनेक लोकप्रतिनिधी शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत असल्याचे चित्र दिसत असून,

"ऑपरेशन टायगर" हे केवळ राजकीय समीकरण बदलणारे अभियान नसून महाराष्ट्राच्या राजकारणातील नव्या अध्यायाचे प्रतीक ठरत असल्याची चर्चा सध्या सर्वत्र सुरू आहे.

**– केतन भोज, घाटकोपर**

# वृक्ष हेच मोलाचे'; बहुलीत डॉ. संतोष पाटील यांची देशातील पहिली 'वृक्ष तुला'

## ५० व्या वाढदिवसानिमित्त १३५ प्रजातींच्या २ हजार रोपांचा अनोखा गौरव

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर :** राजकीय व्यक्ती, पुढारी किंवा नेत्यांच्या वाढदिवसाला पेढे, साखर किंवा लाडू तुला होणे ही सामान्य बाब आहे. मात्र, सिल्लोड तालुक्यातील 'फटाकेमुक्त' व 'पर्यावरण ग्राम' असलेल्या बहुली येथील निसर्गप्रेमी ग्रामस्थांनी एक आगळावेगळा पायंडा पाडत देशातील पहिली 'वृक्ष तुला' करून पर्यावरण रक्षणाचा नवा आदर्श प्रस्थापित केला आहे.

गेल्या २५ वर्षांपासून बहुली गावशी जिव्हाळा जपणारे आणि मागील २० वर्षांपासून पर्यावरण, वन्यजीव व वृक्ष संवर्धनासाठी अविरत कार्य करणारे डॉ.



संतोष पाटील यांचा ५० वा वाढदिवस गावकऱ्यांनी अशा अनोख्या पद्धतीने साजरा केला.

या सोहळ्यात काही रोपांचे वृक्षारोपण प्रातिनिधिक स्वरूपात करण्यात आले. उर्वरित सर्व रोपे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून बहुली येथील 'अमृत वनात', परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतबांधावर, केऱ्हाळा येथील वारकरी संस्था आणि खेळणा फाटा येथील संघाच्या ७ एकर जागेत लावून त्यांचे जतन व संगोपन करण्यात येणार आहे. हरित महाराष्ट्र घडवण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम राज्यभर राबविले जावेत, असा विश्वास बहुलीकरांनी व्यक्त केला.

या प्रसंगी संजय शिरसाठ, भाऊसाहेब निकोद, मधुकर जंजाळ, प्रभात पिसाळ, गजानन जंजाळ, राधाकृष्ण साखळे, समाधान जगदाळ, श्रीरंग तुपे, रवींद्र तुपे, प्रभू जंजाळ, भिकन सोनोने, ऋषिकेश पंडित, डॉ. शिरसाठ, कृष्णा जरारे, राजू लवटे, सुधाकर बनसोडे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

**अनोखी 'वृक्ष तुला'**

**या उपक्रमाची माहिती देताना भाऊसाहेब निकोद यांनी सांगितले की, तराजूच्या एका पारड्यात सन्मानमूर्ती डॉ. संतोष पाटील आणि दुसऱ्या पारड्यात त्यांच्या वजनाइतके विविध स्वदेशी दुर्मिळ झाडांचे संच ठेवण्यात आले होते. यात वायवर्ण, पारस पिंपळ, मोह, पांढरा गुंज, विजयसार, जारूळ, कदंब, अमलतास, काटे सावर आणि सोन सावर यांसारख्या तब्बल १३५ प्रजातींच्या वृक्षांचा समावेश होता. ५० व्या वर्षाचे प्रतीक म्हणून प्रति वर्ष ४० या दराने एकूण २,००० रोपांची ही 'वृक्ष तुला' करण्यात आली.**

# मातोश्रींच्या स्मृतिदिनानिमित्त महेश साळुंखे यांच्याकडून विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी आपल्या मातोश्री सुमन साळुंखे यांच्या स्मृती दिनानिमित्त रायगड जिल्हा परिषदच्या वडघर प्राथमिक शाळा येथे मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम घेतला होता. या कार्यक्रमाला मुंबई प्रदेशाध्यक्ष अमित हिरवे , महाराष्ट्र राज्य सहसचिव अरुण जाधव, विमानतळ प्रकल्पग्रस्त नेते प्रेम पाटील , उद्योजक सुजित गुळवे, उद्योजक राहुल पाटील, पनवेल तालुका अध्यक्ष प्रशांत सोनवणे, पनवेल महानगरपालिका अध्यक्ष निलेश कांबळे , मनोज कांबळे, वडघर प्राथमिक शाळेचे स्थानिक स्कूल कमिटीचे उपसभापती अरूण कांबळे , अशोक कदम, किशोर कदम, महिला आघाडी अध्यक्ष ममताज पठाण, अल्पसंख्यांक अध्यक्ष आसिफ शेख, जावेद मास्टर, प्राथमिक शाळेचे शिक्षक जयदास घरत, शिक्षक जितेंद्र महाले व शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक या कार्यक्रमाला उपस्थित होते. महेश साळुंखे हे दरवर्षी सामाजिक जाणीव म्हणून समाजातील



गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना अडचण येऊ नये म्हणून मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करीत असतात. त्याचाच एक भाग म्हणून यावर्षी त्यांनी मोफत वहया वाटपाचा कार्यक्रम घेतला . वर्षभर ते असेच समाज उपयोगी वस्तूंचे वाटप वेगवेगळया निमित्ताने करत असतात आणि त्यांच्या या कार्याला समाजातील अनेक जण सहकार्य करत असतात. गोरगरिबांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आणि गोरगरिबांना शिक्षण घेत असताना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये म्हणून महेश साळुंखे कार्यरत असतात अशी माहिती उपस्थित मान्यवरांनी दिली आहे.

# उरणच्या १७ तारखेचा आगळा वेगळा आनंद !!

**दैनिक युवक आधार**

**उरण प्रतिनिधी /सागर घरत :** दर १७ तारखेला उरणच्या विमला तलावावर कविकट्टा नियमित भरतो ऐकून होतो,तो प्रत्यक्ष अनुभवण्याचा आनंद कोमसाप उरणने दिलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष पदामुळे मिळाला. कट्ट्यावरची सहजता, कार्यकर्त्यांची,तत्परता आणि अध्यक्षांचे कामामातील योगदान आणि मांडणी आगळीवेगळी आणि आनंददायी.यावेळी साहित्य रत्न प्रा.एल.बी.पाटील, कोकण रस्त्याचे अभ्यासक चैतन्य उषा लक्ष्मण, प्राचार्य ओहोळसर, भुवनेश्वर पाटील, राम म्हात्रे,देवदत्त सूर्यवंशी, मारोती तांबे, मिना ब्रीद,प्रवीण पुरो, विवेक भांडारकर,



घनशाम कडू, दैनिक युवक आधारच्या उरण तालुका महिला प्रतिनिधी तसेच महाराष्ट्र सुपर फास्टच्या कार्यकारी संपादिका तृप्ती भोईर इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक मच्छिंद्र म्हात्रे यांनी केले तर सूत्रसंचालन संजय होळकर यांनी उत्तम केले.

आगरी ज्येष्ठ पुंडलिक म्हात्रे यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले,तर सुनील पाटील, मनोहर म्हात्रे,न.ग. पाटील,अवंतिका महाडिक, वैभव धनावडे ,कल्पना म्हापुसकर यांना बक्षिस पात्र " एल्गार टोल विरुध्द कवितां "साठी सन्मानित करण्यात आले.झालेल्या कविसंमेलनात संजीव पाटील,अनिल भोईर, हेमंत पाटील,सूरेश मिस्त्री, रामचंद्र म्हात्रे, अनामिका राम,मनोहर म्हात्रे,नारायण पाटील,संजय होळकर, सुनील पाटील यांनी पावसाच्या आगमनानंतर कविता सादर केल्या. यानंतर चैतन्य उषा लक्ष्मण पाटील यांच्या सोबत उरणच्या पत्रकारांनी घेतलेली मुलाखत फारच छान होऊन श्रोत्यांनाही आनंद देऊन गेली.

# उरण कोप्रोली येथे प्रथमच दिव्यांग रोजगार मेळाव्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर**

**उरण रायगड :** दिव्यांग बांधवांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आई फाउंडेशन आणि डॉ. रेडीज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सुशिक्षित बेरोजगार दिव्यांग व्यक्तींसाठी दिव्यांग रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा रोजगार मेळावा शनिवार, दिनांक 20 जून 2026 रोजी सकाळी 10 ते दुपारी 2 वाजेपर्यंत युनियन बँकेसमोर, कोप्रोली, ता. उरण, जि. रायगड येथे आयोजित करण्यात आला आहे.या मेळाव्यात 10 वी, 12 वी, आयटीआय, डिप्लोमा तसेच पदवीधर शिक्षण पूर्ण केलेल्या दिव्यांग युवक-युवतींना विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी पूर्वनोंदणीसाठी आयोजकांनी दिलेल्या ऑनलाइन लिंकद्वारे आपली माहिती भरावी, असे आवाहन करण्यात आले आहे.




दिव्यांग बांधवांना स्वावलंबी बनविणे आणि त्यांच्या कौशल्यांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असून, परिसरातील पात्र दिव्यांग युवक-युवतींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक संस्था आई फाउंडेशन आणि डॉ रेड्डी फाउंडेशन यांनी केले आहे. ऑनलाइन माहिती भरायची लिंक-


https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSenV-1P2e9UYI-6rjCdsU-mUC5aXmo8-wqSk4e-u2ptImoKukt9w/viewform.अधिक माहितीसाठी९३२१५२५२४५,८८०५२८८८३०,९८६६८६९१३७, या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताह प्रारंभ'.. पंडित सुरज शर्मा यांच्या सुमधुर वाणीतून भागवत.

**दैनिक युवक आधार**

**सचिन ठाकूर प्रतिनिधी धामणगाव रेल्वे :** स्थानिक गवळीपुरा कॉटन मार्केट चौक येथील पवित्र श्री हनुमान मंदिर परिसरात मंगळवार पासून प्रारंभ झाली असून सोमवार २२ जून २०२६ पर्यंत 'संगीतमय श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे'आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यामुळे भक्तीचे चैतन्य प्राप्त झाले आहे. सुप्रसिद्ध भागवताचार्यांच्या पंडित सुरज शर्मा यांच्या सुमधुर वाणीतून श्रीमद् भागवत चे रसपान होत आहे सदर भक्ती सोहळा दररोज दुपारी २:०० ते सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात आलेला आहे. श्रीमती ममता जगशरणजी तिवारी आणि समस्त तिवारी परिवाराने या परिवाराने भागवत कथेचे आयोजन केले आहे 22 जूनला कथेची सांगता झाल्यानंतर



२३ जून २०२६ (मंगळवारला भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.भाविकांनी भागवत कथेचा लाभ घेण्याची आवाहन तिवारी परिवाराने केले आहे

# राजेश नंदपुरे यांना शैक्षणिक ,सांस्कृतिक ,सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**भंडारा प्रतिनिधी :** भंडारा -पवनी तालुक्यातील चिचाळ येथील रहिवासी प्राध्यापक राजेश नंदपुरे यांच्या शैक्षणिक सांस्कृतिक सामाजिक क्षेत्रातील कार्याची, दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात .परंतु शासन स्तरावर त्यांची दखल घेतली जात नाही म्हणून अशा कार्यकर्त्यांची दखल व्हावी, त्यांच्या कार्याची कदर व्हावी , व त्यांना सन्मान मिळावा , व त्यांच्या कार्याला गती मिळावी या उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. प्रा. राजेश नंदपुरे सरस्वती कान्हेट स्कूल आणि जिजाऊ महिला सहकारी पतसंस्था चे संस्थापक असून गेल्या 25 वर्षांपासून त्यांनी नागपूर विद्यापीठात इंग्लिश चे प्राध्यापक म्हणून काम केले आहे. त्याचप्रमाणे गरीब मुलांना



मोफत शिक्षण आणि योग्य संस्कार आणि ग्रामीण विकासात महिलांचा सहभाग यासाठी त्यांची चळवळ सतत सुरू आहे. त्यांच्या कार्याची पावती म्हणून त्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ , मानाचा फेटा देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .त्यांच्या या मिळालेल्या जिल्हास्तरीय सन्मान पुरस्कार बद्दल त्यांच्या अनेक च्या त्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

# तबला वादन, नादविज्ञान व ज्योतिषीय तत्त्वांच्या आंतरशाखीय अभ्यासासाठी डॉ. प्रशांत गायकवाड यांना मानद डॉक्टरेट व सह्याद्री रत्न सन्मान

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपुर :** भारतीय शास्त्रीय संगीत, नादविज्ञान, ज्योतिषशास्त्र आणि सांस्कृतिक शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे प्रख्यात तबलावादक, शिक्षणतज्ज्ञ व संशोधक डॉ. प्रशांत मनोहर गायकवाड यांना पुणे येथील पत्रकार भवनात आयोजित भव्य समारंभात Nalanda NIIRC University, Bihar तर्फे Honorary Doctorate Award (Honoris Causa) तसेच Nalanda Bharat Gaurav Samman 2026 प्रदान करून गौरविण्यात आले. याच प्रसंगी नालंदा फाउंडेशनच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय “सह्याद्री रत्न पुरस्कार सोहळा २०२६” मध्ये त्यांना प्रतिष्ठेचा “सह्याद्री रत्न सन्मान” बहाल करण्यात आला.

“तबला वादन, नाद व ज्योतिषीय तत्त्वांचा मानवी जीवनावर होणारा प्रभाव : एक आंतरशाखीय अभ्यास” या विषयावरील त्यांच्या दीर्घकालीन संशोधनकार्य, सांस्कृतिक योगदान आणि समाजोपयोगी उपक्रमांच्या गौरवार्थ हा सन्मान प्रदान करण्यात आला. प्रसिद्ध अभिनेते सुनील नाना गोडबोले तसेच प्रख्यात विधितज्ज्ञ ॲड. पी. टी. गांधी यांच्या हस्ते त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

डॉ. गायकवाड हे भारतीय शास्त्रीय संगीताच्या प्रतिष्ठित बनारस घराण्याच्या परंपरेशी निगडित आहेत. त्यांना संगीताचे शिक्षण स्वर्गीय पं. अभिजित कुमार मजूमदार आणि पद्मविभूषण पं. किशन महाराज यांच्यासारख्या महान गुरूकडून लाभले आहे. सध्या ते भवन्स भगवानदास पुरोहित विद्या मंदिर, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे संगीत शिक्षक (तबला) म्हणून कार्यरत आहेत.



विशेष म्हणजे, डॉ. गायकवाड यांचे कुटुंब अनेक पिढ्यांपासून वाद्यनिर्मिती व्यवसायाशी जोडलेले आहे. या सांगीतिक परंपरेचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर व संशोधनदृष्टीवर मोठा प्रभाव पडला असून संगीत, नादविज्ञान आणि ध्वनीच्या मानवी जीवनावरील परिणामांबाबतच्या त्यांच्या अभ्यासाला राष्ट्रीय स्तरावर विशेष दाद मिळाली आहे.

डॉ. गायकवाड हे Guinness World Record Holder असून त्यांनी सलग ३२४ तास तबलावादन करून जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. तसेच भारतीय संस्कृती व ज्योतिषशास्त्राच्या माध्यमातून ४७ देशांतील प्रतिनिधींना भारतीय कला व संस्कृतीचे प्रशिक्षण देऊन त्यांनी आणखी एक विश्वविक्रम नोंदविला आहे.शैक्षणिकदृष्ट्या ते NET उत्तीर्ण, संगीत विशारद आणि संगीत अलंकार पदवीधारक आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी विशारद, अलंकार तसेच पीएच.डी. पदव्या प्राप्त केल्या आहेत. त्यांच्या सहा विद्यार्थ्यांना CCRT Fellowship मिळाली असून अनेक शिष्यांनी राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

डॉ. गायकवाड यांनी आतापर्यंत २४ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना मोफत संगीत व सांस्कृतिक शिक्षण दिले आहे. भारतीय संस्कृतीच्या जतन व प्रसारासाठी केलेल्या कार्याची दखल घेत भारत सरकारच्या प्रतिष्ठित “हर कंठ में भारत” या उपक्रमासाठीही त्यांची निवड करण्यात आली आहे.

हा सन्मान स्वीकारताना डॉ. प्रशांत गायकवाड यांनी आपल्या यशाचे श्रेय माता-पिता, पूज्य गुरुवर्य स्वर्गीय पं. अभिजित कुमार मजूमदार आणि पद्मविभूषण पं. किशन महाराज यांना दिले. तसेच भारतीय विद्या भवनचे अध्यक्ष श्री. राजेंद्र पुरोहित, संचालिका श्रीमती अन्नपूर्णी शास्त्री आणि प्राचार्या श्रीमती लीना वर्गीस यांचे त्यांनी विशेष आभार मानले. त्यांच्या सहकार्यामुळेच संगीत, शिक्षण, संस्कृती आणि संशोधन क्षेत्रात सातत्याने कार्य करता येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. गायकवाड यांना प्राप्त झालेला हा सन्मान केवळ त्यांच्या वैयक्तिक कर्तृत्वाचा गौरव नसून भारतीय शास्त्रीय संगीत, नादविज्ञान, ज्योतिषशास्त्र आणि पारंपरिक ज्ञानपरंपरेच्या जागतिक प्रतिष्ठेचे प्रतीक मानला जात आहे. विदर्भासह देशभरातील संगीत, कला व सांस्कृतिक क्षेत्रातून त्यांच्या या यशाबद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


# नवी मुंबईत प्रथमच गळ्यावर कसलाही व्रण किंवा छेद न करता केली थायरॉईड शस्त्रक्रिया; खारघरच्या मेडिकव्हर रुग्णालयात यशस्वी उपचार

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** मेडिकव्हर हॉस्पिटल्स, नवी मुंबई येथे पहिल्यांदाच अत्याधुनिक ट्रान्सओरल एंडोस्कोपिक व्हेस्टिब्युलर अप्रोच थायरॉईडेक्टॉमी (TOEVA) या पद्धतीद्वारे एका ३० वर्षीय महिलेवर यशस्वीपणे पूर्णपणे व्रणरहित (Scarless) थायरॉईड शस्त्रक्रिया करण्यात आली. या शस्त्रक्रियेमुळे रुग्णाच्या गळ्यावर कोणतीही दृश्यमान जखम न राहता थायरॉईडमधील गाठ यशस्वीरित्या काढण्यात आली.

पेण येथील गृहिणी असलेल्या रुग्ण नेहा सिंग (नाव बदललेले)* गेल्या दोन वर्षांपासून मानेवर गाठ असल्याचे जाणवत होते. या गाठीमुळे ती शारीरिक त्रासाबरोबरच मानसिक तणावालाही सामोरी जात होती. शस्त्रक्रियेनंतर गळ्यावर कायमस्वरूपी व्रण राहील या भीतीमुळे तिचा आत्मविश्वास कमी झाला होता आणि त्या सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासही टाळाटाळ करत होती.

कुटुंबीयांनी विविध ठिकाणी उपचारांचा शोध घेतल्यानंतर त्यांनी मेडिकव्हर हॉस्पिटल्स, नवी मुंबई



येथील सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. राहुलकुमार नारायण चव्हाण यांच्याशी संपर्क साधला. आवश्यक तपासण्या व समुपदेशनानंतर रुग्णेला तोंडावाटे केली जाणारी अत्याधुनिक व्रणरहित थायरॉईड शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला देण्यात आला.

डॉ. राहुलकुमार नारायण चव्हाण म्हणाले,* रुग्णाला थायरॉईडमधील गाठ होती आणि गळ्यावर व्रण राहण्याची तीव्र चिंता होती. तपासणीनंतर ही गाठ सौम्य स्वरूपाची (Benign Tumour) असल्याचे दिसून आले. त्यामुळे आम्ही ट्रान्सओरल एंडोस्कोपिक व्हेस्टिब्युलर अप्रोच थायरॉईडेक्टॉमी (TOEVA) ही पूर्णपणे व्रणरहित शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. सौंदर्यदृष्ट्या गळ्यावर कोणतीही खूण न राहणे हे या रुग्णेसाठी महत्त्वाचे होते. पारंपरिक थायरॉईड शस्त्रक्रियेमध्ये गळ्यावर स्पष्टपणे दिसणारा व्रण राहतो, ज्याचा मानसिक आणि सामाजिक परिणाम विशेषतः तरुण रुग्णांवर होऊ शकतो.

डॉ. चव्हाण पुढे सांगतात की,* ही शस्त्रक्रिया अत्यंत कौशल्यपूर्ण असून तोंडावाटे मर्यादित जागेत आधुनिक एंडोस्कोपिक उपकरणं आणि कॅमेऱ्याच्या सहाय्याने केली जाते. रोबोटिक शस्त्रक्रियेच्या तुलनेत ही अधिक किफायतशीर असून उत्कृष्ट सौंदर्यात्मक परिणाम देते. या रुग्णेची संपूर्ण थायरॉईड ग्रंथी तोंडावाटे काढण्यात आली. त्यामुळे गळ्यावर कोणतेही व्रण आढळून आले नाही. परिणामी रक्तस्त्राव कमी झाला, वेदना कमी झाल्या आणि शारीरिक तसेच मानसिक पुनर्वसन अधिक जलद गतीने झाले.सुमारे तीन तास चाललेल्या या शस्त्रक्रियेनंतर रुग्णेची प्रकृती उत्तम असून तिला जखमेची खूण राहिलेली नाही.

रुग्णेने आपल्या अनुभवाबद्दल सांगताना म्हटले,* माझ्या गळ्यावर गाठ आढळल्यानंतर मी खूप घाबरले होते. योग्य डॉक्टरांच्या शोधात असताना आम्ही डॉ. राहुलकुमार चव्हाण यांना भेटलो. त्यांनी उपचाराची संपूर्ण माहिती देऊन माझा आत्मविश्वास वाढवला. शस्त्रक्रिया यशस्वी झाली आणि माझ्या गळ्यावर कोणताही व्रण राहिलेला नाही. मी मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांचे मनापासून आभार मानते.

खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे सेंटर हेड संदीप जोशी म्हणाले,* प्रगत आणि रुग्णकेंद्री आरोग्यसेवा देण्याचा आमचा मानस आहे. व्रणरहित थायरॉईड शस्त्रक्रिया ही केवळ वैद्यकीयदृष्ट्या नव्हे तर रुग्णाचा आत्मविश्वास आणि भावनिक आरोग्यासाठीही महत्त्वाची ठरत आहे. आधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी तज्ज्ञ आणि उत्तमोत्तम सेवेच्या माध्यमातून सर्वोत्तम उपचार उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील.

तज्ज्ञांच्या मते, भारतात अद्यापही व्रणरहित थायरॉईड शस्त्रक्रियेबाबत जनजागृती कमी आहे.

अत्यंत मर्यादित तज्ज्ञांकडून ही शस्त्रक्रिया केली जाते. मात्र अशा यशस्वी उपचारांमुळे रुग्णांना आधुनिक आणि सौंदर्यदृष्ट्या सुरक्षित उपचार पर्याय उपलब्ध असल्याची माहिती अधिक व्यापकपणे पोहोचण्यास मदत होणार आहे.

# पत्रकार पंकज रहांगडाले विदर्भस्तरीय पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**भंडारा विशेष प्रतिनिधी :** गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यात वास्तव्यात असलेल्या पंकज रहांगडाले यांच्या पत्रकारिता सामाजिक क्षेत्रातील कार्याची, दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात .परंतु शासन स्तरावर त्यांची दखल घेतली जात नाही म्हणून अशा कार्यकर्त्यांची दखल व्हावी, त्यांच्या कार्याची कदर व्हावी , व त्यांना सन्मान मिळावा , व त्यांच्या कार्याला गती मिळावी या उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. पंकज रहांगडाले मागील पंधरा वर्षापासून पत्रकारिता सामाजिक चळवळीत अग्रेसर असून त्यांच्या कार्याची पावती म्हणून त्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ , मानाचा फेटा देऊन



मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, अशोकराव सोनवणे फुले, शाहू ,आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ विचारवंत छत्रपती संभाजी नगर, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .त्यांच्या या मिळालेल्या जिल्हास्तरीय सन्मान पुरस्कार बद्दल त्यांच्या अनेक च्या त्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

# विदेशी नोकरीचे आमिष दाखवून तरुणांना पावणेदोन कोटींचा गंडा ; ऑल इंडिया सिफेरर्स युनियन आक्रमक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल,(वार्ताहर) :** विदेशात शिपिंग कंपनीत नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत अनेक बेरोजगार तरुणांची तब्बल 1 कोटी 73 लाख 81 हजार 400 रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. खारघर येथील अव्हॉन नेव्हिगॉझ मरीन्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ऑल इंडिया सिफेरर्स युनियन आक्रमक



झाली आहे.खारघर सेक्टर-7 येथील कार्यालयातून संबंधित कंपनीकडून मलेशिया तसेच इतर देशांमध्ये शिपिंग क्षेत्रात नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन दिले जात होते. नोकरीसाठी सर्व्हिस चार्ज, व्हिसा प्रक्रिया, विमान तिकीट व इतर खर्चाच्या नावाखाली उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणात रक्कम उकळण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. बेरोजगार तरुणांनी कंपनीच्या प्रतिनिधींच्या सांगण्यावरून विविध बँक खात्यांमध्ये टप्प्याटप्प्याने पैसे जमा करण्यात आले. मात्र पैसे भरल्यानंतरही नोकरी, व्हिसा किंवा परदेश प्रवासाबाबत कोणतीही ठोस माहिती देण्यात आली नाही. उलट संबंधितांनी उमेदवारांशी संपर्क टाळण्यास सुरुवात केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. खारघर येथील कार्यालयदेखील बंद असल्याचे आढळून आले. त्यामुळे फसवणूक झालेल्यानी याची माहिती आर्थिक गुन्हे शाखेच्या सहाय्यक पोलीस आयुक्त प्रेरणा कट्टे यांच्यापर्यंत पोहोचल्यानंतर खारघर येथील शिपिंग कंपनीविरोधात गुन्हा दाखल त्यांनी दखल घेत आपल्या पथकाला खारघर पोलीस ठाण्यात पाठविले. या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन तातडीने गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु केली. त्यानंतर संबंधितांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला.या प्रकरणात कंपनीचे कथित मालक, व्यवस्थापक आणि इतर कर्मचाऱ्यांनी संगनमताने नोकरीच्या आमिषाने तरुणांकडून पैसे उकळल्याचा आरोप करण्यात आला आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करीत असून संबंधितांविरोधात कठोर कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात येत आहे. याबाबत ऑल इंडिया सिफेरर्स युनियनचे अध्यक्ष संजय पवार यांनी नवी मुंबईचे सहपोलीस आयुक्त दीपक साकोरे यांना लेखी निवेदन देऊन संबंधित शिपिंग कंपनीविरोधात कठोर कारवाईची मागणी केली आहे.


## जाहीर नोटीस

नमुना एन डी

(नियम ९२(३) पहा)

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. 5188/PNL/98 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46C0135 चे मालक कै.राजेश किसन काकडे याचं दिनांक 21-09-2025 रोजी निधन झाले आहे.

मी

पुष्पा राजेश काकडे

सेक्टर -02,कळंबोली ता-पनवेल, रायगड, महाराष्ट्र, -410218.

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.

याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

**उत्तरआधिकारचे नाव-**
**पुष्पा राजेश काकडे**
**सेक्टर -02,कळंबोली ता-पनवेल,**
**रायगड,महाराष्ट्र,410218.**


# पाहणी करून दोन वर्षे उलटली तरी वीज उपकेंद्र कागदावरच; घोटी आणि कुर्ली येथील शेतकऱ्यांचा वीज वनवास संपणार कधी?

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** एकीकडे डिजिटल इंडियाच्या आणि अखंडित वीज पुरवठ्याच्या गप्पा मारल्या जात असताना, दुसरीकडे मात्र लोकप्रतिनिधींनी विधानसभेत आवाज उठवून आणि प्रशासनाने प्रत्यक्ष जागेची पाहणी करूनही दोन वर्षांपासून घोटी आणि कुर्ली येथील प्रस्तावित वीज उपकेंद्रांचा प्रश्न अधांतरीच लटकला आहे. आर्णी-केळापूर मतदारसंघाचे आमदार राजूभाऊ तोडसाम यांनी या भागातील विजेची भीषण समस्या पाहता विधानसभेत दोन्ही गावांमध्ये ३३/११ केव्ही उपकेंद्र (सबस्टेशन) मंजूर करण्याची आग्रही मागणी केली होती. त्यानंतर २४ डिसेंबर २०२४ रोजी अगदी सायंकाळच्या सुमारास अमरावती विभागाच्या वरिष्ठ पथकासह स्थानिक अभियंते आणि कुर्लीचे सरपंच सतीशजी गडमवार यांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी केली. पाहणी झाली, अहवालही



अमरावतीच्या मुख्य कार्यालयात सादर झाला, पण त्यानंतर 'निधी नाही' असे सांगत प्रशासनाने या संपूर्ण प्रकल्पावरच थंड पाणी ओतले, ज्याला आता तब्बल दोन वर्षे उलटून गेली आहेत.

घोटी आणि कुर्ली या दोन्ही मोठ्या महसुली गावांमधील शेतकऱ्यांना आणि ग्रामस्थांना आजही त्याच जुन्या, दळभद्री 'लो-व्होल्टेज' आणि वारंवार खंडित होणाऱ्या विजेचा सामना करावा लागत आहे.

पिकांना पाणी देण्यासाठी रात्री-अपरात्री शेतात जागून काढावी लागते, त्यातच कमी दाबाच्या विजेमुळे महागडे कृषी पंप जळून खाक होत असल्याने आधीच संकटात असलेला शेतकरी पुरता कोलमडला आहे. दोन वर्षांपूर्वी जेव्हा अधिकारी मोजमाप करायला गावात आले होते, तेव्हा आता तरी विजेचे संकट मिटेल अशी आशा निर्माण झाली होती; मात्र शासकीय उदासीनतेमुळे ही आशा आता निराशेत बदलली आहे. तांत्रिक अहवाल तयार असूनही केवळ सरकारच्या बजेटमध्ये तरतूद नसल्याने हे काम रखडले असून, या रखडलेल्या कामाला गती मिळून प्रत्यक्षात वीज उपकेंद्र उभे राहण्यासाठी अजून किमान एक ते दोन वर्षांचा कालावधी लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

आता लोकप्रतिनिधी आगामी अधिवेशनात विशेष निधीसाठी पुन्हा सरकारवर दबाव आणणार का आणि महावितरण या दोन्ही गावांचा हा हक्काचा प्रश्न कधी मार्गी लावणार, याकडेच संपूर्ण परिसरातील जनतेचे डोळे लागले आहेत.


## जाहीर सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की, पायाभूत सुविधांच्या अधिक चांगल्या सोयीसाठी, 'आशीर्वाद मायक्रो फायनान्स लिमिटेड'च्या ' परतुर शाखे'चे (सध्याचे ठिकाण: मराठा क्रांती भवनच्या पाठीमागे साई नगर परतुर जिल्हा-जालना पिन कोड - 431501) कामकाज दिनांक 20-06-2026 पासून खालील नवीन पत्त्यावर स्थलांतरित केले जाईल:साई नगर ज्ञानलता इंग्लिश स्कूल समोर

अनुज निवास परतुर जिल्हा - जालना पिन कोड - 431501 महाराष्ट्र ग्राहकांना होणारा त्रास टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले गेले आहेत, तरीही काही अडचण आल्यास पुढील मार्गदर्शनासाठी कृपया खालील क्रमांकांवर संपर्क साधावा. संपर्क: शाखा प्रमुख (Branch Head):9637527238 क्षेत्र प्रमुख (Area Head):95612 53650 प्रादेशिक प्रमुख (Reasonal Head):88880 10178

येथे पत्रव्यवहार करा

आशीर्वाद मायक्रो फायनान्स लिमिटेड (मनापुरम फायनान्स लिमिटेडची उपकंपनी) नोंदणीकृत कार्यालय: क्र. 9,9 वा मजला, क्लब हाऊस रोड, अण्णा सलाई, चेन्नई 600 002, तामिळनाडू, भारत आशीर्वाद मायक्रो फायनान्स लिमिटेड (मनापुरम फायनान्स लिमिटेडची उपकंपनी) कॉर्पोरेट कार्यालय: इमारत क्र. 4/85 बी, सी आणि डी, चंथप्पाडी, वालापाड, त्रिशूर, केरळ, भारत - 680567



## जाहीर निविदा

परतूर येथील शासकीय तांत्रिक विद्यालयातील निर्लेखित फर्निचर, हत्यारे , अवजारे, उपकरणे, संगणक, इत्यादी साहित्य, निविदा पद्धतीने विक्री करावयाचे आहे. हि निविदा 24/06/2026 पर्यंत भरून सादर करावीत. तसेच विक्री करावयाचे स्क्रॅप साहित्य सूचना प्रसिध्द झाल्यापासून कार्यालयीन वेळेत पहावयास उपलब्ध राहील. खरेदीदार इच्छुकांनी मुख्याध्यापक, शासकीय तांत्रिक विद्यालय केंद्र परतूर यांच्याशी संपर्क साधावा. इतर सविस्तर माहिती व निविदेच्या अटी व शर्ती बाबतची माहिती भांडार विभागात पहावयास उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. असे मुख्याध्यापक शासकीय तांत्रिक विद्यालय केंद्र परतूर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

**सही**
**मुख्याध्यापक**
**शासकीय तांत्रीक विद्यालय केंद्र परतूर, जि. जालना**

# जल्लोष : भविष्य समर ट्रेनिंग 2.0 च समारोपीय कार्यक्रमाचा

**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी** : लाखनी: आर्ट्स ऑफ लाईफ अकॅडमी लाखनी या कोचिंग संस्थेमध्ये गेल्या 30 दिवसांपासून सातत्याने चालत असलेल्या उन्हाळी शिबिर म्हणजेच भविष्य समर ट्रेनिंग 2.0 या शिबिराचा शेवटचा दिवस म्हणजे समारोपीय दिवस खूप थाटामाटात 10 जून 2026 रोजी साजरा करण्यात आला. या समारोपीय कार्यक्रमाला या ट्रेनिंगला लाभलेले सर्व प्रशिक्षक उत्साहाने सहभागी झाले. सर्व प्रशिक्षकांनी लाखनी तालुक्यातील या समर ट्रेनिंग मध्ये सहभागी झालेल्या सर्व उत्कृष्ट विद्यार्थ्यांची स्तुती करत त्यांचे समोर ट्रेनिंग चे संपूर्ण अनुभव पालकांसमोर तसेच विद्यार्थ्यांसमोर व्यक्त केले. या समर ट्रेनिंगला लाभलेले गणिताचे प्रशिक्षक मा. प्रतीक जी जामगडे साहेब यांनी पालकांना आणि विद्यार्थ्यांना भविष्यकालीन संध्या आणि भविष्यात गरजेचे असलेले संपूर्ण ज्ञान याविषयी मार्गदर्शन केलं आणि खूप गोड शब्दांमध्ये त्यांनी विद्यार्थ्यांची स्तुती करून त्यांना प्रोत्साहन दिले. या समर ट्रेनिगला लाभलेले तांत्रिकी प्रशिक्षक मा. स्वप्निलजी वनकर साहेब यांनी अतिशय प्रेरणादायी शब्दांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि स्वतःचे या समर् ट्रेनिंगचे अनुभव सर्वांसमोर व्यक्त केले. त्याचसोबत अवघ्या सहा दिवसांमध्ये विद्यार्थ्यांनी बनविलेल्या विविध वेबसाईट सर्व पालकांसमक्ष दाखवण्यात आले. खूप कमी कालावधीमध्ये विद्यार्थ्यांनी बनवलेल्या वेबसाईटला बघून उपस्थित बालकांचे मन भरून आले होते. त्यानंतर या भविष्य समर ट्रेनिंग चा पाया रचणारे आणि सातत्याने दरवर्षी या उन्हाळी शिबिराला आयोजित करणारे आणि ही संकल्पना समाजामध्ये रुजवण्याचा प्रयत्न करणारे आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग चे संचालक मा. निहालजी वालदे सर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन करत तसेच पालकांना आणि लाखनी तालुक्यातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत या कार्यक्रमाची शोभा वाढवली. सर्व प्रशिक्षकांचे आणि आयोजकांचे मनोगत झाल्यानंतर सहभागी विद्यार्थ्यांचा मनोबल वाढवण्याच्या उद्देशाने तसेच त्यांनी केलेल्या परिश्रमाची जान म्हणून विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याचं कार्यक्रम ठेवण्यात आलं. या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना मानपत्र सोबतच मेडल आणि ट्रॉफी देऊन प्रत्येक विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमामधील काही क्षण इतके भाऊक होते की भरपूर पालकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या डोळ्यांमध्ये अश्रू आले ते म्हणजे असे की भरपूर विद्यार्थ्यांचे पालक या कार्यक्रमाला उपस्थित होते आणि श्री निहाल वालदे सरांनी त्या पालकांच्या हस्ते त्यांच्या मुलांचं सत्कार करण्याचं ठरवलं जेव्हा पालक त्यांच्या मुलांना मानपत्र मेडल आणि ट्रॉफी देत होते त्या वेळेला पालकांसमोर आणि तसेच विद्यार्थ्यांचे मन सुद्धा भरून आले. हा कार्यक्रम इथेच थांबले नाही तर तांत्रिकी प्रशिक्षक म्हणजेच गुरु शिष्य मल्टी स्किल्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे मालक श्री स्वप्नीलजी वनकर सर यांनी खूप मोठं अनाउन्समेंट केलं ते असं की जेवढे विद्यार्थी या उन्हाळी शिबिराला लाभलेले होते त्या सर्व विद्यार्थ्यांना तीन महिन्याचं प्रशिक्षण मोफत देण्याचं त्यांनी ठरवलं आणि या विद्यार्थ्यांना त्यांच्या कंपनीसोबत लाईव्ह प्रोजेक्ट वर काम करण्याचं संधी उपलब्ध करून दिली. पालकांनी आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग आभार मानलं आणि असे ट्रेनिंग्स सातत्याने ही कोचिंग अकॅडमी विद्यार्थ्यांसाठी आणि लाखनी करांसाठी सतत ठेवत राहील आणत राहील अशी आशा प्रत्येक पालकांनी दाखवली तसेच विद्यार्थ्यांनी सुद्धा या अकॅडमीला भरघोस साथ दिला. हे कार्यक्रम 10 जून ला ठेवण्याचं मागचं उद्देश आणि कारण असं होतं की 10 जूनला आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग अकॅडमी उदयास आली, त्याच दिवशी आर्टस ऑफ लाईफ कोचिंग चे संचालक श्री निहाल वालदे सर यांचा जन्मदिवस असतो या सर्व गोष्टींना मान देत सर्व आयोजकांनी 10 जून हा समर ट्रेनिंग समारोपीय दिवस म्हणून निवडला. हे संपूर्ण कार्यक्रम youtube live च्या माध्यमातून प्रत्येक घराघरात पोहोचवण्याच्या उद्देशाने हा संपूर्ण कार्यक्रम youtube वर लाईव्ह व्हिडिओच्या स्वरूपात उपलब्ध आहे कोणीही आर्टस ऑफ लाइफ कोचिंग च्या यूट्यूब चैनल वर जाऊन हे संपूर्ण कार्यक्रम बघू शकतो. कार्यक्रमाच्या शेवटी व्हाट्सअपला कोचिंग चे संचालक श्री निहाल वालदे सर यांनी एक घोषणा केली ती म्हणजे लाखनी तालुक्यातील तसेच संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी एक वरदान ठरणार अशी घोषणा त्यांनी केली त्या घोषणेमध्ये त्यांनी असं सांगितलं की संपूर्ण वर्षभर ते मोफत रित्या सर्व विद्यार्थ्यांना आणि पालकांना शैक्षणिक दृष्ट्या सबळ आणि मजबूत बनवण्यासाठी ऑनलाईन वेबिनार ठेवणार आहेत प्रत्येक रविवारी ते त्या ऑनलाईन वेबिनार मार्फत सर्व विद्यार्थ्यांना तसेच पालकांना शैक्षणिक रित्या जागरूक करणे आणि पुढील वाटचालीसाठी त्यांना प्रत्येक बाबींमध्ये मदत करणे ह्या हेतूने हे कार्यक्रम ते राबविणार आहेत ते पण वर्षभर. श्री निहाल वालदे सर प्रत्येक वर्षी वेगवेगळे उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी राबवत असतात त्यांच्या या उपक्रमांना सोबतच त्यांच्या या प्रयत्नांना लाखनी करांची साथ मिळेल अशी आशा श्री निहाल वालदे सरांनी दर्शवली. शेवटी अल्पोहाराचं कार्यक्रम झाल्यानंतर कार्यक्रम तिथेच संपला. श्री निहाल वालदे सरांना आणि त्यांच्या या आर्टस ऑफ लाईफ कोचिंग अकॅडमी संस्थेला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## अल्पवयीन मुलींना वेश्याव्यवसायात ढकलणाऱ्या महिला दलालाला अटक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : उलवा परिसरात अल्पवयीन मुलींना पैशांच्या आमिषाने वेश्याव्यवसायात ढकलल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणी एका महिला दलालाविरुद्ध गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उलवा पोलिसांनी कारवाई करत आरोपी महिलेला अटक केली असून न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील तपास सुरू आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सेक्टर 19 मधील एका लॉजमध्ये अल्पवयीन मुलींना ग्राहकांसाठी उपलब्ध करून दिले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर सापळा रचण्यात आला. छापेमारीदरम्यान दोन अल्पवयीन मुलींची सुटका करण्यात आली. प्राथमिक चौकशीत आरोपी महिला स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी मुलींना देहव्यापारासाठी प्रवृत्त करत असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात भारतीय न्याय संहिता 2023, अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायदा, बालकांचे लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा तसेच बाल न्याय अधिनियमातील विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अल्पवयीन मुलींच्या शोषणाशी संबंधित गंभीर स्वरूपाच्या कलमांचा समावेश असल्याने प्रकरणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी रोख रक्कम, मोबाईल फोन आणि इतर साहित्य असा सुमारे 38 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या रॅकेटमागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, तसेच मुलींना या व्यवसायात आणण्यासाठी कोणते जाळे कार्यरत होते, याचा तपास पोलीस करत आहेत.

उलवा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली असून, अल्पवयीन मुलांच्या सुरक्षिततेशी संबंधित गुन्ह्यांबाबत पोलिसांचा कठोर दृष्टिकोन कायम राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## सातबारा दुरुस्तीसाठी ६० हजारांची लाच मागणारे श्रीवर्धन प्रांत कार्यालयातील अव्वल कारकून आणि शिपाई एसीबीच्या जाळ्यात

### पहिला हप्ता स्वीकारताना रंगेहात अटक; महसूल विभागात खळबळ

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : सामान्य नागरिकांच्या शासकीय कामांसाठी होणारी आर्थिक पिळवणूक पुन्हा एकदा उघड झाली आहे. सातबारा उताऱ्यावरील दुरुस्तीच्या कामासाठी तब्बल ६० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या श्रीवर्धन उपविभागीय अधिकारी (प्रांत) कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सापळा रचून रंगेहात अटक केली.

अव्वल कारकून नितीन पवार आणि शिपाई सचिन पाटील अशी अटक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची नावे आहेत. या कारवाईमुळे श्रीवर्धन महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

दोन महिन्यांपासून शेतकऱ्याची कार्यालयात हेलपाटे मिळालेल्या माहितीनुसार, श्रीवर्धन तालुक्यातील पाबळे येथील एका शेतकऱ्याच्या सातबारा उताऱ्यातील दुरुस्तीचे काम गेल्या दोन महिन्यांपासून प्रलंबित होते. आपल्या हक्काच्या कामासाठी संबंधित शेतकरी वारंवार प्रांत कार्यालयात पाठपुरावा करत होता. मात्र, शासकीय प्रक्रियेत अडथळे निर्माण करून काम करून देण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी त्याच्याकडे ६० हजार रुपयांची लाचेची मागणी केली.

लाच देण्यास नकार देत शेतकऱ्याने या प्रकाराची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला दिली. त्यानंतर एसीबीने तक्रारीची पडताळणी करून कारवाईची तयारी केली.

३० हजारांचा पहिला हप्ता घेताना कारवाई



एसीबीच्या पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने श्रीवर्धन प्रांत कार्यालयात सापळा रचला. ठरल्याप्रमाणे लाचेच्या रकमेतील पहिला हप्ता म्हणून ३० हजार रुपये स्वीकारताना अव्वल कारकून नितीन पवार आणि शिपाई सचिन पाटील यांना एसीबीच्या अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले.

अचानक झालेल्या या कारवाईमुळे प्रांत कार्यालयात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. एसीबीच्या पथकाने दोन्ही कर्मचाऱ्यांना ताब्यात घेत पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे.

**भ्रष्टाचाराची पाळेमुळे शोधण्याची शक्यता**

या प्रकरणात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, संबंधित कर्मचाऱ्यांच्या यापूर्वीच्या व्यवहारांची तसेच मालमत्तेची चौकशी होण्याची शक्यता आहे.

सामान्य नागरिकांच्या कामांसाठी लाच मागणाऱ्या प्रवृत्तीविरोधात एसीबीने केलेल्या या कारवाईचे श्रीवर्धन तालुक्यातून स्वागत होत आहे. महसूल विभागातील भ्रष्ट कारभारावर या कारवाईमुळे मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## सहकार महर्षी माणिकराव पालोदकर: शिक्षण व सहकाराचे शिल्पकार



‘व्यक्ती जन्माने नव्हे, तर कर्तृत्वाने आणि विचारांनी ओळखली जाते.’ या उक्तीचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे राज्याचे माजी सहकार व महसूल राज्यमंत्री, खासदार कर्मयोगी सहकार महर्षी माणिकराव पालोदकर (दादासाहेब). शिक्षण, सहकार, कृषी व उद्योग क्षेत्राची मुहूर्तमेढ रोवून सिल्लोड तालुक्याचा सर्वांगीण विकास घडवून आणणारे नेतृत्व म्हणून आजही ते जनमानसाच्या स्मरणात आहेत. १९ जून १९२४ ते २३ मे २००२ या ७८ वर्षांच्या कालखंडात त्यांनी केलेले कार्य आजच्या पिढीसाठी दिशादर्शक आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन.

**•खेळणा प्रकल्पाचे जनक•**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या सिल्लोड तालुक्यातील पालोद ही त्यांची जन्मभूमी आणि कर्मभूमी. संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील ‘तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे...’ या उक्तीप्रमाणे त्यांनी कार्याचा ठसा उमटवला. खेळणा नदीच्या काठावर त्यांच्या दूरदृष्टीतून साकारलेला ‘खेळणा मध्यम प्रकल्प’ आजही सिल्लोड शहरासह आठ ते दहा गावांची पिण्याच्या पाण्याची तहान भागवत आहे.

•शिक्षण क्षेत्रातील वटवृक्ष•

२ नोव्हेंबर १९७१ रोजी त्यांनी ग्रामीण भागात ‘राजश्री शाहू शिक्षण संस्थे’ची स्थापना केली. यशवंतराव चव्हाण यांच्या नावाशी साधर्म्य असणारे महाविद्यालय सुरू करून, पुढे ‘यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय’ असा त्याचा विस्तार केला. आज सिल्लोड, सोयगाव, फुलंब्री आणि भोकरदन तालुक्यांत ज्ञानाचे दीप उजळणारी ही संस्था एका वटवृक्षाप्रमाणे विस्तारली आहे. सहकारातून सामान्यांचा विचार करणारे महर्षी म्हणून ओळखले जाणारे माणिकराव पालोदकर यांचे कार्य सिल्लोड तालुक्याच्या विकासाचा मुख्य आधारस्तंभ राहिले आहे.

**— डॉ. रमेश देविदास काळे**
**(सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालय, पालोद)**

**बहुआयामी कारकीर्द व संस्थात्मक वारसा**
**माणिकराव पालोदकर यांनी विविध पदांवर राहून विकास साधला:**

**•राजकीय प्रवास: सिल्लोड पंचायत समिती सभापती (१९६२-६७), औरंगाबाद जिल्हा परिषद अध्यक्ष (१९६७-७२), लोकसभा सदस्य (१९७१-७७) आणि सलग १५ वर्षे विधानसभा सदस्य (१९८०-९५).**

**•मंत्रिपद: वसंतदादा पाटील मंत्रिमंडळात सार्वजनिक बांधकाम व उत्पादन शुल्क राज्यमंत्री, तर शिवाजीराव पाटील निलंगेकर मंत्रिमंडळात सहकार व महसूल राज्यमंत्री म्हणून त्यांनी राज्याच्या धोरणात्मक निर्णयांत भूमिका बजावली.**

**•संस्थात्मक निर्मिती: सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना (माणिकनगर), सिद्धेश्वर नागरी सहकारी बँक, सिद्धेश्वर सहकारी पतसंस्था, सिद्धेश्वर सहकारी सूतगिरणी व औद्योगिक वसाहतीचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ दिले.**

**•महत्त्वाची पदे: राज्याच्या पंचायत राज समितीचे सदस्य, वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष, कृषी मूल्य आयोगाचे सदस्य, रेल्वे बोर्डाचे (हैदराबाद डिव्हिजन) सदस्य, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान (मुंबई) आणि वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (पुणे) चे सदस्य.**

## पत्रकारांची बदनामी केल्याचा आरोप ; मुळावा, गौळ व पोफाळी परिसरातील पत्रकारांची पोलीस ठाण्यात तक्रार

### सोशल मीडियावरील आक्षेपार्ह स्टेटसविरोधात कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी / राजू गायकवाड (मोहदरी)** : सोशल मीडियावर पत्रकारांविषयी अपमानास्पद व बदनामीकारक मजकूर प्रसारित केल्याचा आरोप करत मुळावा, गौळ आणि पोफाळी परिसरातील पत्रकारांनी पोफाळी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. संबंधित व्यक्तीविरुद्ध सायबर बदनामी आणि फौजदारी मानहानीच्या अनुषंगाने कायदेशीर कारवाई करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.




तक्रारीनुसार, गौतम वसंता कांबळे (रा. पिंपळदरी, ता. उमरखेड) यांनी १७ जून २०२६ रोजी त्यांच्या व्हॉट्सॲप स्टेटसवर पत्रकारांविषयी आक्षेपार्ह आशयाचा मजकूर प्रसारित केला. या मजकुरात सरकारी कार्यालये, पोलीस ठाणे, विविध संस्था तसेच वाद-विवाद, गुन्हे, रेती तस्करी, अवैध दारू विक्री यांसारख्या प्रकरणांमध्ये पत्रकारांची भूमिका संशयास्पद असल्याचे सरसकट आरोप करण्यात आल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे.

तक्रारदार पत्रकारांचे म्हणणे आहे की, संबंधित स्टेटसमध्ये कोणत्याही विशिष्ट व्यक्तीचे नाव नसले तरी संपूर्ण पत्रकार समाजावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. त्यामुळे पत्रकारांविषयी समाजात गैरसमज, अविश्वास आणि द्वेषाची भावना निर्माण होण्याची शक्यता असून पत्रकारिता क्षेत्राची प्रतिमा मलिन होत आहे.

पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली जाते. जनहिताचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचविणे, नागरिक आणि शासन यांच्यातील दुवा म्हणून काम करणे ही पत्रकारांची जबाबदारी असते. अशा परिस्थितीत संपूर्ण पत्रकार समाजाला लक्ष्य करणारे लिखाण निषेधार्ह असून भविष्यात अशा घटना घडू नयेत, अशी भूमिका पत्रकारांनी तक्रारीत मांडली आहे.

सदर प्रकरणाची चौकशी करून संबंधित सोशल मीडिया पोस्टची पडताळणी करण्यात यावी तसेच भारतीय न्याय संहितेतील लागू तरतुदींनुसार संबंधित व्यक्तीविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारदार पत्रकारांनी पोफाळी पोलिसांकडे केली आहे. पोफाळी पोलीस ठाण्याचे ठाणेदार निलेश शेंबडे या तक्रारीची चौकशी करीत आहे.

## जि.प.पूर्ण प्राथमिक आदर्श शाळा कोंडमळा नं.१येथील शाळा प्रवेशोत्सव उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**चिपळूण प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर** : निरागस,गोंडस, प्रफुल्लित, चेहऱ्यावर आनंद अशी ही मुले पहिल्यांदाच शाळेत प्रवेशकर्ते होणार म्हणून त्यांचा आनंद ओसंडून वाहत असतो.शाळेतील पहिला दिवस त्यांच्यासाठी नवपर्वणीच असते.असा आगळा वेगळा१ली तील नवगतांचा शाळा प्रवेशोत्सव चिपळूण तालुक्यातील मु.कोंडमळा येथील जि.प.शाळा पूर्ण प्राथमिक शाळा कोंडमळा नं.१येथे मोठ्या उत्साहात झाला.सर्व प्रथम



नवीन प्रवेशकर्त्या मुलांची सजविलेल्या रिक्षा मधून ड्रमबीट आणि विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकासह वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.विद्यार्थ्यांच्या सवाद्य प्रभातफेरीतून पंचक्रोशीतील वातावरण प्रफुल्लित झाले होते.१ली मध्ये प्रवेश घेणाऱ्या मुलांचे पेपर वर नाव लिहून त्यांच्या पायाचे कसे घेत,औक्षण करुन आनंदी,सुहास्यवदनाने उत्साहात प्रवेश देण्यात आला.हा क्षण सर्वांसाठी भावूक, आनंददायी, प्रेरणादायी असाच होता. शालेय शिक्षणाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा क्षण असल्याने त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणित झाला होता.कार्यक्रमाची संकल्पना विलोभनीय अशीच होती. जि.प.पूर्ण प्राथमिक आदर्श शाळा नं.१येथील नवगतांच्या या आयोजित प्रवेशोत्सवासाठी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती, पालक, ग्रामस्थ यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला.हा नवगतांचा प्रवेशोत्सव माजी विद्यार्थ्यांनी पाहिल्यानंतर त्यांनाही आनंद झाला आहे.लहानपण देगा देवा!या प्रमाणे या शाळेचे माजी विद्यार्थी, समाजसेवक व कोंडमळाचे सुपुत्र अरविंद सुर्वे यांनी सर्वांचे कौतुक करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देत अभिनंदन केले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# देशातील प्रादेशिक पक्षांची फोडाफोडी: डीलिमिटेशन विधेयकाचा दीर्घकालीन 'प्लान बी'

देशात सध्या राजकीय पक्षांमध्ये फुट, बंडखोरी आणि फोडाफोडीचे सत्र सुरू झाले आहे. एका बाजूला हे घटनाक्रम केवळ सत्तेच्या राजकारणाचे भाग म्हणून पाहिले जात आहेत, तर दुसऱ्या बाजूला यामागे एक मोठी, सुयोजित आणि दीर्घकालीन रणनीती कार्यरत असल्याचे चित्र उभे राहत आहे. विशेषतः डीलिमिटेशन विधेयक (परिसीमन विधेयक) पास करण्यासाठी ही सगळी फोडाफोडी राबवली जात असल्याचा दावा केला जात आहे.

पत्रकार म्हणून मी या घटनांचा सखोल आढावा घेतला आहे. पहिल्यांदा शिवसेना फोडली गेली, नंतर राष्ट्रवादी काँग्रेस, त्यानंतर आम आदमी पार्टी, बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस आणि आता पुन्हा उद्धव ठाकरे यांच्या उरलेल्या शिवसेनेची फूट. हा केवळ योगायोग नाही, तर एका मोठ्या राजकीय क्लायमॅक्सचा भाग आहे, असे अनेक निरीक्षक मानतात.

**डीलिमिटेशन विधेयकाची पार्श्वभूमी आणि गरज**

भारत स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकसंख्येच्या वाढीप्रमाणे लोकसभेच्या सदस्य संख्येत वाढ अपेक्षित होती. १९७६ साली लोकसभेची सदस्य संख्या ५४३ पर्यंत वाढवण्यात आली. मात्र त्यानंतर गेली पन्नास वर्षे ही संख्या बदललेली नाही.

मोदी सरकारने २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी ही संख्या सुमारे ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव ठेवला होता. एप्रिल महिन्यात हे *डीलिमिटेशन* *विधेयक* लोकसभेत आणि राज्यसभेत मांडण्यात आले. मात्र ते पास होऊ शकले नाही. लोकसभेत ५४ मतांनी आणि राज्यसभेत २२ मतांनी ते अपयशी ठरले. विरोधकांनी याला मोठा विजय समजला.

विरोधकांचा मुख्य युक्तिवाद असा होता की, लोकसंख्येच्या आधारावर सीट वाढवल्यास उत्तर भारतातील राज्यांना (उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, राजस्थान इ.) जास्त प्रतिनिधित्व मिळेल. दक्षिण भारतातील राज्ये (तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश) शिक्षण आणि कुटुंब नियोजनात यशस्वी ठरल्याने त्यांची लोकसंख्या नियंत्रणात राहिली. त्यामुळे त्यांचे संसदीय महत्व कमी होईल. उत्तर भारत हा भाजपाचा मुख्य गड असल्याने या विधेयकामुळे भाजपाला दीर्घकाळ सत्ता टिकवणे सोपे होईल, असा आरोप होता.

**फोडाफोडीचा 'प्लान बी' आणि आकडेवारी**

भाजपाने हार मानली नाही. दीर्घकालीन रणनीतीनुसार विरोधकांची फोडाफोडी सुरू झाली. लोकसभेत विधेयक पास करण्यासाठी ३६२ खासदारांच्या समर्थनाची गरज आहे. २०२४ च्या



निवडणुकीनंतर एनडीए गटाकडे २९३ खासदार होते. म्हणजे ६९ खासदारांची कमतरता होती.

या कमतरता भरून काढण्यासाठी खालील फूट घडल्या:

*शिवसेना (उद्धव ठाकरे गट)* : सहा खासदार फुटले. (ऑपरेशन टायगर यशस्वी)

*तृणमूल काँग्रेस (टीएमसी)* : बंगालमध्ये २० खासदार फुटले. त्यांनी एनसीपीआय या पक्षात विलीनीकरण केले, जो एनडीएचा मित्रपक्ष आहे.

यामुळे एनडीएची संख्या ३१९ पर्यंत पोहोचली. अजूनही ४२ खासदारांची गरज आहे.

**पुढील लक्ष्यस्थाने**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट):* आठ खासदार. *ऑपरेशन तुतारी* अंतर्गत चर्चा सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत.

तामिळनाडू - डीएमके:* २२ खासदार. विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेसने दिलेल्या धक्क्यामुळे स्टॅलिन गट दुखावला गेला आहे. भाजपाकडून सरसकट *५० टक्के सीट* वाढीचे लेखी आश्वासन देण्याची चर्चा आहे. जर हे आश्वासन मिळाले तर डीएमके पाठिंबा देऊ शकतो.

उत्तर प्रदेश - समाजवादी पक्ष:* अखिलेश यादव यांच्याकडे ३७ खासदार. पुढील वर्षी विधानसभा निवडणुका असल्याने येथेही हालचाली होऊ शकतात.

जर डीएमके जोडले गेले तर संख्या ३४१ होईल. अजून २१ खासदारांची गरज राहील.

**राज्यसभेचे गणित**

राज्यसभेत विधेयक पास करण्यासाठी १६३ मतांची गरज आहे. सध्या एनडीएकडे १४८ आहेत. राघव चड्डा यांच्यासह सात खासदार आल्याने ही संख्या वाढली आहे. टीएमसी खासदारांच्या राजीनाम्यामुळे पोटनिवडणुका होणार आहेत. पंजाबमध्ये २०२७ मध्ये निवडणुका असून, तेथे भाजप सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न करत आहे. यामुळे राज्यसभेतील १५ मतांची कमतरता लवकरच भरून निघू शकते.

**दीर्घकालीन परिणाम काय?**

जर हे विधेयक पास झाले तर पुढील २५ वर्षे भाजपाला उत्तर भारतातील वाढीव जागांमुळे मजबूत बहुमत मिळवणे सोपे होईल. ट्रिपल तलाक आणि कलम ३७० हटवताना जशा क्रॉस व्होटिंगच्या रणनीतीचा वापर झाला, तसेच येथेही होऊ शकते.

**जनतेसमोर प्रश्न**

फोडाफोडीच्या या राजकारणाने देशाचे कल्याण होणार आहे का? की हे केवळ एका पक्षाचे सत्ताकेंद्रीकरण आहे? पक्षांतील एकजूट, तत्त्वनिष्ठा आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण कसे होणार? मतदार म्हणून आपण सजग राहणे गरजेचे आहे.

आपले विचार कमेंटमध्ये नक्की कळवा.

**लेखक दिपक कोळवणकर, (पत्रकार)**

---

# घोंगड्यातील आश्रयी जीवन

आदिवासी डोंगराळ भागात दऱ्याखोऱ्यात कडेकपारीत लोकांनी भाजणीचे काम आटपले आहे.आता जून महिन्यात पावसाचे मृग नक्षत्र सुरू झाले असल्याने पावसाळ्यात भेडसावणाऱ्या समस्या आणि उपाय ह्या सर्व गोष्टी विचारात घेऊन शेतकरी शेती अवजारे, औत ( नांगर),जू , अळवट (गाळ सपाट करण्यासाठी फळीसारखे अवजार),कुदळा ह्या लाकडी अवजारांचा मोठ्या प्रमाणात उपयोग शेती कामासाठी करतात. त्यामुळे जंगलात भटकंती करून अळव,साग ह्या झाडांचे निरिक्षण करत वाकड्या फांदी पासून कुदळा बनवतात. औत शक्यतो साग, तिवस, खरशिंग ह्या झाडाच्या लाकडापासून तयार करतात. त्याबरोबर पावसाळ्यातील मुलभूत गरज म्हणजे घोंगडा हे डोक्यावरील घर आहे.

पुर्वीपासून शेतकरी बांधवांचे निसर्गाच्या सान्निध्यात डोंगर कपारीत शेती मातीवर राबताना थंडी,शिळणदार( मुसळधार) पावसात काम करताना स्वःताचे संरक्षण करण्यासाठी घोंगडा हे साधन आहे.सध्या जून महिन्यात शेतकरी बांधवांना घोंगडा बनवण्याची काळजी लागली आहे. मानेल किंवा काटेरी बांबूचे टोकर तोडून त्यापासून कींबी काढून घोंगडा विनला जातो त्यावर पळसाची पाने साकारली जातात.वरती झाडाचा वाख ( झाडाची दोरीसारखी साल) एकमेकांत गुंतवून बांधून घेतले जाते त्याला दिवसभर मोठी मेहनत करून विनले जात होते.आता पळसाच्या पानाची जागा बाजारातील प्लास्टिकने घेतली आहे.काही ठिकाणी तर घोंगडा बांबूच्या नाहरा पासून विनत होते. त्याला पळसाच्या पानं शिवण्याची गरज भासत नव्हती फक्त थंडी शिळणदार पावसात वाजू नये आतील भागात शाल टाकली जायची घोंगड्याला वरच्या बाजूला एक टोक काढली जायची घोंगड्याचा प्रामुख्याने पावसाळ्यात शेती कामासाठी भात, नागली, वरी किंवा इतर पीके रोपणीसाठी पावसाळयात स्वसंरक्षणासाठी उपयोग केला जातो.घोंगड्यासारखे जूने साधन सध्यातरी दुसरे आले नाही. छत्री,किंवा रेनकोट सारख्या हलक्या वजनाच्या वस्तू बाजारात उपलब्ध आहेत.शक्यतो नवीन मुलं ह्याच वस्तू खरेदी करताना दिसतात.



घोंगडा बांबूच्या किंबी पासून तयार केल्याने पावसाळ्यात भर झडीत शेतकरी कोणत्याही प्रकारची भीती न बाळगता काम करत असतात. बसून भाताचे,नागलीचे रोप काढतात मुठ (पुळया) बांधतात. लावणी ,रोपणी करतात.चिखलणी केल्यानंतर अळवटून( सपाट करून) देताना एका हातात काठी दुसऱ्या हाताने जनावरांच्या नाकातील येसणीला बांधलेला (कासरा)दोर घट्ट धरून अळवटावर (निठेठाळ) उभे राहून काम करतात. औत (नांगर) दिवसभर हुसकतात घोंगडा डोक्यावर घेतले की दोन्ही हात मोकळे राहतात त्यामुळे कामाला अडचण येत नाही. काम सहज करता येते.शेतमजूर दुसऱ्याच्या शेतात मजुरीला जाताना डोक्यावर घोंगडा घेऊन डोंगरातील सुन्या वाटेच्या चोळव्याने पायपीट करतात. दोबड( रेडे) ,बैल चारत असतांनाही त्याचा वापर केला जातो. घोंगड्यात पुर्ण शरीर झाकले जाते, पाण्याने भिजत नाही.त्यामुळे सर्दी पडसे,ताप हे आजार रोज दिवसभर काम केले तरी होत नाही शरीर थकते हे खरे आहे.पण आजारपण सहसा उद्भवत नाही.

आदिवासी भागातील लोकांची जुन्या पिढीतील विचारसरणी आजच्या धावपळीच्या जीवनात वावरताना तरूणांत दिसत नाही. आता थोडंफार पावसाने भिजले तरी आजारपण येते.

**सुभाष कामडी**
**( आदिवासी साहित्य अभ्यासक)**

---

# सामाजिक बांधिलकीच्या कार्याची दखल; प्रतिमा जुमडे यांना 'शिवछत्रपती प्रेरणा पुरस्कार' प्रदान

## रिसोडच्या सामाजिक कार्यकर्त्यांचा गौरव; विद्यार्थी, युवा वर्ग व समाजसेवकांसाठी ठरल्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व

**दैनिक युवक आधार**
**रणजित ठाकुर रिसोड तालुका प्रतिनिधी** : रिसोड,समाजहितासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या आणि सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांत सक्रिय सहभाग नोंदविणाऱ्या रिसोड येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. प्रतिमा अमोल जुमडे (न्यू विदर्भ मेडिकल, रिसोड) यांना नुकत्याच पार पडलेल्या भव्य कार्यक्रमात प्रतिष्ठेचा 'शिवछत्रपती प्रेरणा पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या सन्मानामुळे रिसोड शहरासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



विद्यार्थी हक्क कृती समिती महाराष्ट्र राज्य, वाशिम जिल्हा यांच्या वतीने आयोजित नियुक्ती समारंभ, गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान कार्यक्रम मोठ्या उत्साहात व दिमाखदार वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात शिक्षण, सामाजिक क्षेत्र, युवक विकास आणि जनजागृती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्यात आले. त्यामध्ये सौ. प्रतिमा जुमडे यांची निवड 'शिवछत्रपती प्रेरणा पुरस्कार'ासाठी करण्यात आली.

कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी हक्क कृती समितीचे वाशिम जिल्हाध्यक्ष सुमित मधुकर जमदाडे यांनी केले होते. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून नगराध्यक्ष भगवान दादा क्षीरसागर यांची उपस्थिती लाभली. प्रमुख मार्गदर्शक म्हणून तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी उपस्थितांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

आपल्या भाषणात तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी विद्यार्थ्यांना यशाचे मोलाचे धडे देताना सांगितले की, "विद्यार्थ्यांची गुणवत्ता ही केवळ टक्केवारीवरून ठरत नसून त्याच्या बुद्धिमत्ता, जिद्द, चिकाटी आणि जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर अवलंबून असते." त्यांनी युवा पिढीला व्यसनमुक्त राहण्याचे आवाहन करत आदर्श समाजनिर्मितीसाठी युवकांनी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त केली. विविध उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

या कार्यक्रमाला पत्रकार केशव गरकळ, अमोल लोथे, पंचायत समिती सदस्य राहुल बोडखे, युवा कार्यकर्ते, विद्यार्थी आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच सिद्धार्थ इंगोले यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती, व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक जाणीव याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर मनोगत व्यक्त करताना सौ. प्रतिमा जुमडे म्हणाल्या की, "हा पुरस्कार माझ्यासाठी केवळ सन्मान नसून समाजकार्यात अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा आहे. समाजासाठी केलेल्या निस्वार्थ कार्याची समाजाकडून दखल घेतली जाते, हे या सन्मानातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

प्रत्येकाने समाजासाठी काहीतरी सकारात्मक योगदान देण्याचा प्रयत्न करावा. सामाजिक कार्य म्हणजे केवळ कार्यक्रम राबविणे नव्हे, तर एक चांगला नागरिक म्हणून जबाबदारीने जगणे, सामाजिक बांधिलकी जपणे आणि इतरांना मदतीचा हात देणे होय."

त्यांनी पुढे सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच आपल्याला या पुरस्कारासाठी निवडून सन्मानित केल्याबद्दल आयोजक सुमित जमदाडे व विद्यार्थी हक्क कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

रिसोड परिसरात सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणाऱ्या सौ. प्रतिमा जुमडे यांचा झालेला हा गौरव अनेक महिलांसाठी, युवकांसाठी आणि समाजकार्यात कार्यरत असलेल्या व्यक्तींसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या कार्याची घेतलेली ही दखल भविष्यात आणखी मोठ्या सामाजिक उपक्रमांना चालना देणारी ठरेल, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

'शिवछत्रपती प्रेरणा पुरस्कार' प्राप्त करून सौ. प्रतिमा जुमडे यांनी रिसोडच्या सामाजिक क्षेत्राचा मान उंचावला असून, त्यांच्या या यशाबद्दल विविध सामाजिक संस्था, व्यापारी संघटना, महिला मंडळे आणि नागरिकांकडून त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात येत आहे.

---

# डॉ. सुरेश खोब्रागडे संविधान सन्मानाने पुरस्कृत

**दैनिक युवक आधार**
**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी** : येथील सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. सुरेश खोब्रागडे यांना संविधान फाउंडेशन नागपूरच्या वतीने 2024 सालीसाठी डॉ. भीमराव रामजी आंबेडकर संविधान सन्मानपत्र प्रदान करून एका विशेष कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपिठाचे न्यायमूर्ती एनशिवराज खोब्रागडे, वर्धेचे उपजिल्हाधिकारी प्रताप वाघमारे, सेवानिवृत्त आय.ए.एस. अधिकारी इ.झेड. खोब्रागडे यांच्या प्रमुख





उपस्थितीत आणि संविधान फाउंडेशनच्या अध्यक्षा रेखा खोब्रागडे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. नागपूर येथील विदर्भ साहित्य संघाच्या अमेय सभागृहातील विशेष समारोहात पुरस्कार समारंभ नुकताच संपन्न झाला.डॉ. सुरेश खोब्रागडे यांची कविता, नाटक, समीक्षा, वैचारिक अशी विविध स्वरूपाची बारा पुस्तके प्रकाशित असून नागपूर,गडचिरोली आणि अमरावती विद्यापीठात त्यांच्यावर तीन संशोधक विद्यार्थ्यांनी Ph.D.चे संशोधन कार्य पूर्ण केले असून दोन विद्यार्थ्यांना Ph.D. पदवी प्राप्त झाली आहे. त्यांनी विदर्भस्तरीय संविधान संस्कृती विचार संमेलनाचे आयोजन करून आणि तालुक्यात संविधान विषयक जनजागृती रॅली काढून जनमानसात संविधानाची मूल्य पेरण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या एकूणच समाजोपयोगी निरंतर कार्यामुळे फौंडेशनने त्यांना सन्मानपत्र देऊन पुरस्कृत केले.

---

# धनराज पवार यांचे पदवी परीक्षेत प्रथम श्रेणीत यश

# जिद्द असेल तर मार्ग सापडतो - धनराज पवार

**दैनिक युवक आधार**
**जामखेड प्रतिनिधी**
**बापुसाहेब घोडेस्वार** : जामखेड येथील धनराज भगतसिंग पवार यांनी बी.ए. (मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम) पदवी परीक्षेत प्रथम श्रेणीत यश संपादन केल्याबद्दल शहरासह तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



**जिद्द असेल तर मार्ग सापडतो,परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, चिकाटी, मेहनत आणि जेष्ठांचे मार्गदर्शन असेल तर यश मिळविता येते. शिक्षण हीच प्रगतीची खरी गुरुकिल्ली आहे.**

**— धनराज पवार**

भटके-विमुक्त समाजातील धनराज पवार यांची यशोगाथा अनेक युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. कोरोना महामारीच्या काळात त्यांच्या आईचे निधन झाले. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असताना आणि स्वतः विवाहित असूनही अनेक अडचणींना सामोरे जात त्यांनी शिक्षणाची वाट सोडली नाही. अनेक वेळा उदरनिर्वाहाची चिंता असतानाही त्यांनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर शिक्षण सुरू ठेवले.

प्रतिकूल परिस्थितीतही जेष्ठांचे मार्गदर्शन, कुटुंबीयांचे सहकार्य आणि स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर त्यांनी बी.ए. एम.सी.जे. परीक्षेत प्रथम श्रेणीत यश संपादन केले.

त्यांच्या या यशामुळे समाजातील अनेक युवकांना संघर्षातून मार्ग काढण्याची प्रेरणा मिळाली आहे.धनराज पवार हे जनतेच्या मनातील लोकपत्रकार म्हणून ओळखले जातात. सामाजिक, शैक्षणिक आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविणाऱ्या पवार यांची जामखेड तालुक्यासह विविध स्तरांवर लोकप्रियता दिसून येते.

त्यांनी कोणतेही यश संपादन केले की, विविध संस्था, संघटना, मित्रपरिवार आणि शुभेच्छुकांकडून त्यांच्या सत्कारांचा अक्षरशः वर्षाव होतो. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सामाजिक,शैक्षणिक, राजकीय ,आरोग्य, कृषी, तंत्रज्ञान, क्रीडा आणि विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार व नातेवाईक यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## 16 ग्रॅम वजनाची चेन खेचून चोरटा पसार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पायी चालत जाणाऱ्या फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याची चैन खेचून चोर मोटरसायकल वरून पसार झाले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.यातील फिर्यादी हे व्हिके हायस्कूल ते पुणे मुंबई हायवेवर फुटपाथवरून पायी चालत जात होते. वडाळा तलावाच्या बाजूला असलेल्या नंदनवन सोसायटीच्या समोर आले असता त्यांच्यासमोर हेल्मेट घातलेला इसम आला. त्यांनी फिर्यादीच्या गळ्यातील चेन खेचून बाजूला उभे असलेल्या मोटरसायकल वरून ते हायवेच्या दिशेने पळून गेले.

## दुकानासमोर साहित्य ठेवण्यावरून केली शिवीगाळ

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** दुकानासमोर साहित्य ठेवण्यावरून वाद होऊन शिवीगाळ केल्याप्रकरणी अलीसागर ओरा याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.यातील दिलीप तिवारी आणि अलिसागर ओरा हे एकमेकांच्या ओळखीचे आहेत. त्यांचे पनवेल भाजी मार्केट येथे शेजारी-शेजारी दुकान असून दुकानासमोर साहित्य ठेवण्यावरून त्यांच्यामध्ये वाद झाला आणि विरोधक अलिसागर याने त्यांना शिवीगाळ केली.

## दोन कोटी 64 लाख 18 हजार रुपयांच्या दागिन्यांची बॅग चोरली

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** टूर्स अँड ट्रॅव्हल्समधून प्रवास करत असताना अनोळखी ईसमाने 2 कोटी 64 लाख 18 हजार रुपये किमतीचे दागिन्यांची बॅग चोरून नेल्या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.यातील फिर्यादी विक्रमसिंग लाखसिंग हे काळबादेवी, मुंबई येथे राहत असून ते त्यांचे साथीदार हेमराज सुतार असे दोघेजण डॉल्फिन टूर्स अँड ट्रॅव्हल्स या कंपनीच्या बसमधून प्रवास करत होते. सीट क्रमांक सात आणि आठ मधून विजापूर कर्नाटक ते पुणे मुंबई एक्सप्रेस हायवे संपल्यानंतर कळंबोली मॅकडोनाल्डच्या समोर पुणे मुंबई लेनवर प्रवास करत असताना अज्ञात इसमाने त्यांच्या ताब्यातील दागिन्यांची असलेली बॅग चोरून नेली. यात सोन्याचे विविध प्रकारचे दागिने, अंगठ्या, पेंडल, लॉकेट, बाळया ,टॉप्स, मंगळसूत्र यांचा समावेश आहे.

## महिलेच्या घरात घुसून अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** महिलेच्या घरात घुसून आरोपीने अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपी गोल्या उर्फ संतोष साहेबराव चव्हाण याच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.पीडित महिला त्यांच्या घरात बसलेल्या होत्या आणि त्यांचे पती घरात झोपले होते. यावेळी गोल्या उर्फ संतोष चव्हाण याने पीडित महिलेच्या घरात घुसून त्यांचा हात पकडला आणि जवळ ओढून अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या पतीला मारहाण केली. आणि पीडित महिलेच्या पोटात लाथ मारली.

# निसर्गाचा बाप नव्हे, रक्षणकर्ता बना!

## श्रद्धा, विकास आणि पर्यावरण यांचा समतोल साधण्याची काळाची गरज

एक काळ असा होता की माणूस निसर्गाला देव मानत होता. सूर्याला नमस्कार करत होता, वृक्षांना जीवनदाता मानत होता, पृथ्वीला माता म्हणत होता आणि नद्यांना जीवनदायिनी मानून त्यांची पूजा करत होता. त्या काळातील पूजा ही केवळ धार्मिक कृती नव्हती, तर निसर्ग संवर्धनाची एक जीवनपद्धती होती. नदीची पूजा म्हणजे नदी स्वच्छ ठेवणे, तिचे पावित्र्य जपणे आणि तिच्या प्रवाहाचे संरक्षण करणे होय. आपल्या पूर्वजांनी नद्यांना माता मानले, म्हणून त्या स्वच्छ, निर्मळ आणि जीवनदायी राहिल्या.

मात्र आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. आपण अजूनही नद्यांची पूजा करतो, पण त्याच वेळी पूजेचे साहित्य, प्लास्टिक, हार-फुले, कपडे, मूर्ती आणि विविध प्रकारचा कचरा नद्यांमध्ये विसर्जित करून त्यांना दूषित करत आहोत. ज्या नदीला आपण माता म्हणतो, त्याच नदीला प्रदूषणाच्या विळख्यात ढकलत आहोत. ही श्रद्धा आहे की नदीवर होणारा अन्याय? हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

इतकेच नव्हे तर नद्यांच्या पात्रामध्ये वाढत चाललेले वाळू उपशाचे आणि खाणींचे साम्राज्य नद्यांचे अस्तित्वच संपवण्याच्या मार्गावर आहे. नदीचे नैसर्गिक प्रवाह बदलत आहेत, जलपातळी खालावत आहे आणि नदीशी निगडित संपूर्ण पर्यावरणीय व्यवस्था धोक्यात आली आहे. एका बाजूला आपण नदीची आरती करतो आणि दुसऱ्या बाजूला पैशाच्या हव्यासापोटी तिचे अस्तित्व उद्ध्वस्त करतो. हा विरोधाभास समाजाने ओळखण्याची गरज आहे.

मानवाला कदाचित हे विसर पडले आहे की त्याची निर्मिती निसर्गातून झाली आहे. हवा, पाणी, अन्न, माती आणि जीवनासाठी आवश्यक असलेली प्रत्येक गोष्ट निसर्गच प्रदान करतो. तरीही माणूस निसर्गाचा स्वामी बनण्याचा प्रयत्न करत आहे. ज्या निसर्गामुळे आपले अस्तित्व आहे, त्याच निसर्गाचा "बाप" बनण्याचा अहंकार आज माणसामध्ये निर्माण झाला आहे.

आज विकासाच्या नावाखाली आरसीसीचे साम्राज्य झपाट्याने वाढत आहे. जिथे हिरवीगार जंगले होती, तिथे सिमेंटची जंगले उभी राहत आहेत. झाडे तोडून उंच इमारती उभ्या राहत आहेत. माणूस विसरत आहे की झाडे केवळ सावली देत नाहीत, तर ती पाऊस, प्राणवायू आणि संपूर्ण जीवनचक्र टिकवून ठेवतात. एक वृक्ष हजारो जीवांचे जीवन सुरक्षित ठेवतो, परंतु माणूस काही क्षणांत त्याचा नाश करतो.

वृक्षतोड, प्रदूषण, अति प्लास्टिकचा वापर, नद्यांचे प्रदूषण, जंगलांचा नाश आणि प्राण्यांवर होणारे अत्याचार यामुळे निसर्गाचे संतुलन बिघडत चालले आहे. म्हणूनच आज पाऊस वेळेवर पडत नाही. कोणताही ऋतू आपल्या ठराविक काळात राहत नाही. उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडतो, हिवाळ्यात उष्णता वाढते आणि पावसाळ्यात दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते. हे सर्व निसर्गाचे दोष नसून मानवी स्वार्थाचे परिणाम आहेत.

जीवनचक्रातील प्रत्येक घटक एकमेकांवर अवलंबून आहे. झाडे असतील तर पाऊस पडेल, पाऊस पडेल तर नद्या वाहतील, नद्या वाहतील तर शेती होईल आणि शेती असेल तर जीवन टिकेल. या साखळीतील एक घटक जरी नष्ट झाला, तरी संपूर्ण जीवनव्यवस्था संकटात येते. परंतु वाढत्या "मीपणा"मुळे माणूस हे मूलभूत सत्य विसरत चालला आहे.

आज माणूस माणुसकीही विसरत आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी तो निसर्गाशी लढत आहे, प्राण्यांना त्रास देत आहे, जंगलांचा नाश करत आहे आणि भविष्यातील पिढ्यांच्या हक्कांवर आघात करत आहे. विकासाच्या नावाखाली विनाशाचा मार्ग स्वीकारला जात आहे. परंतु निसर्ग हा सहनशील असला तरी अमर्याद सहनशील नाही.

जेव्हा निसर्ग रुद्र रूप धारण करतो, तेव्हा मानवी अहंकाराचा क्षणात चुराडा होतो. पूर, दुष्काळ, भूकंप, वादळे, उष्णतेच्या लाटा आणि विविध नैसर्गिक आपत्ती या केवळ घटना नसून निसर्गाचे इशारे आहेत.

निसर्ग जणू सांगत आहे की, "तू माझा भाग आहेस, माझा मालक नाहीस."

आजही वेळ गेलेली नाही. आपण निसर्गावर वर्चस्व गाजवण्याचा विचार सोडून त्याच्याशी सुसंवाद साधला पाहिजे. नदीची पूजा करायची असेल तर ती स्वच्छ ठेवूया. वृक्षांची पूजा करायची असेल तर त्यांचे संवर्धन करूया. पृथ्वीला माता म्हणायचे असेल तर तिचे प्रदूषण थांबवूया. श्रद्धा आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल साधणे हीच काळाची गरज आहे.

लक्षात ठेवा — निसर्गाशिवाय मानवाचे अस्तित्व नाही. आपण निसर्गाचे मालक नाही, तर त्याचे ऋणी आहोत. निसर्गाचा बाप बनण्याचा प्रयत्न थांबवून निसर्गाचे रक्षणकर्ते बनलो, तरच भविष्यातील पिढ्यांना सुरक्षित आणि समृद्ध पृथ्वी देऊ शकू. अन्यथा निसर्गाचा कोप हा मानवाच्या सर्व प्रगतीवर भारी पडेल.

"नद्यांची पूजा करा, पण त्यांना प्रदूषित करू नका. वृक्षांची महती गा, पण त्यांची तोड करू नका. निसर्गाचा आदर करा, कारण निसर्ग टिकला तरच मानव टिकेल."

**लेख : प्रकाश गवारे**

## उरण तालुक्यातील नवघर ग्रामपंचायतीची विशेष ग्रामसभा कोरम आभावी तहकूब !!

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** उरण तालुक्यातील श्रीमंत समजल्या जाणा-या नवघर ग्रामपंचायतीच्या वतीने आज बुधवार दि.१७/०६/२०२६ रोजी ठिक ११-३० वाजता नवघर ग्रामपंचायत कार्यालयात १६ वा वित्त आयोग योजना सन २०२६/२०२७ या वर्षाचे ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी ग्रामसभेचे आयोजन केले असता नवघर,नवघरपाडा आणि कुंडेगाव हे तिन गाव मिळून सदर ग्रामपंचायत आपल्या या तिन्ही गावच्या जडणघडण तसेच विकासाचा कागदावर का होईना पण आपला गाडा कसातरी हाकलत असतो. अश्या या परिस्थीतत आणि आता चालू होणा-या पावसाळयाच्या दिवसा मध्ये अनेक ठिकाणी पावसाच तसेच समुद्राच्या भरतीचं पाणी साचणे,पावसाळयात उद्भवणारे साथीचे आजार,घनकचरा,गांवाची साफसफाई,पावसाळयात कदाचित वारंवार जाणा-या लाईटांचे प्रश्न असे अनेकाहून अनेक प्रश्न पावसाळयात आ वासून उभे असतात.ग्रामस्थांना पावसाळयात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असते. ग्रामपंच्यायत यावर काय तोडगा काढेल किंवा कदाचित काढणार नाही पण प्रत्येक ग्रामस्थांनी ग्रामसभेला हजर राहून आप-आपल्या समस्या मांडायला पाहिजे.ग्रामपंचायत पावसाळ्या आगोदर आपल्या गावांमध्ये काय-काय करायला पाहिजे आणि काय करू नये जेणेकरून पावसाळ्या येथील नागरिकांना उद्भवणा-या आपत्कालीन समस्येवर काहीतरी तोडगा काढता येऊ शकतो. पण नवघर ग्रामपंच्यायतीतील या तिन्ही गावातील ग्रामस्थांना काहीच देणघेण वाटत नाही असे या ग्रामसभेला पुरेशे संख्या(कोरम) नसल्याने ग्रामविकास अधिका-यांना सदर हि विषेश ग्रामसभा तहकूब करावी लागली.आणि एकीकडे ग्रामस्थ ग्रामपंचायती कडून सार्वजनीक विकासांची किंवा ग्रामस्थांच्या हिताची तसेच आपत्कालीन उद्भवणा-या परिस्थितीवर ग्रामपंचायती विरोधात टाहो फोडून बोबांबोब करायची ही पद्धत ग्रामस्थांनी बंद करून होणा-या सर्वच ग्रामसभेला ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थीत राहून आपले प्रश्न सोडवणे गरजेचे आहे असे काही जाणकार नागरिक आपल्या भावना व्यक्त करताना दपक्या आवाजात हिण्या-ओट्यावर,गल्ली बोलात,नाक्या-नाक्यावर बोलताना दिसतात पण ग्रामसभेला उपस्थीत नसतात याचेच नवल वाटत आहे.



## राजेश मेश्राम जिल्हास्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**भंडारा विशेष प्रतिनिधी :** भंडारा तालुक्यात पहेला येथे वास्तव्यात असलेल्या राजेश बिसन मेश्राम यांच्या फुले, शाहू,आंबेडकर चळवळीतील सामाजिक कार्याची, दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळयानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात .परंतु शासन स्तरावर त्यांची दखल घेतली जात नाही म्हणून अशा कार्यकर्त्यांची दखल व्हावी, त्यांच्या कार्याची कदर व्हावी , व त्यांना सन्मान मिळावा , व त्यांच्या कार्याला गती मिळावी या उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्याचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. राजेश मेश्राम मागील 20 वर्षापासून फुले, शाहू, आंबेडकर चळवळीत अग्रेसर असून त्यांच्या कार्याची पावती म्हणून त्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ , मानाचा फेटा देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यापसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, अशोकराव सोनवणे फुले, शाहू ,आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ विचारवंत छत्रपती संभाजी नगर, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .

त्यांच्या या मिळालेल्या जिल्हास्तरीय सन्मान पुरस्कार बद्दल त्यांच्या अनेक च्या त्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.



## राजेश नंदपुरे यांना शैक्षणिक ,सांस्कृतिक ,सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**भंडारा विशेष प्रतिनिधी :** भंडारा पवनी तालुक्यातील चिचाळ येथील रहिवासी प्राध्यापक राजेश नंदपुरे यांच्या शैक्षणिक सांस्कृतिक सामाजिक क्षेत्रातील कार्याची, दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळयानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात .परंतु शासन स्तरावर त्यांची दखल घेतली जात नाही म्हणून अशा कार्यकर्त्यांची दखल व्हावी, त्यांच्या कार्याची कदर व्हावी , व त्यांना सन्मान मिळावा , व त्यांच्या कार्याला गती मिळावी या उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्याचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. प्रा. राजेश नंदपुरे सरस्वती कान्हेट स्कूल आणि जिजाऊ महिला सहकारी पतसंस्था चे संस्थापक असून गेल्या 25 वर्षापासून त्यांनी नागपूर विद्यापीठात इंग्लिश चे प्राध्यापक म्हणून काम केले आहे.

त्याचप्रमाणे गरीब मुलांना मोफत शिक्षण आणि योग्य संस्कार आणि ग्रामीण विकासात महिलांचा सहभाग यासाठी त्यांची चळवळ सतत सुरू आहे. त्यांच्या कार्याची पावती म्हणून त्यांना सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ , मानाचा फेटा देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यापसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .

त्यांच्या या मिळालेल्या जिल्हास्तरीय सन्मान पुरस्कार बद्दल त्यांच्या अनेक च्या त्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.



# कोट्यवधींची उलाढाल, पण सुरक्षा वाऱ्यावर! विंचूर कांदा मार्केट अंधारात; बाजार समितीला जाग कधी येणार?

### लाईट बंद, सीसीटीव्ही बंद, चोरीच्या घटनांनी व्यापाऱ्यांमध्ये भीती; 'काम दिले आहे, पण कधी होईल माहीत नाही' म्हणत समितीची हात झटकण्याची भूमिका

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी :** विंचूर येथील उपबाजार कांदा मार्केटमध्ये सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून बाजार समितीच्या निष्क्रिय कारभारामुळे व्यापारी, शेतकरी आणि हमाल वर्गात तीव्र नाराजी पसरली आहे. जिल्ह्यातील महत्त्वाच्या कांदा बाजारपेठांपैकी एक असलेल्या या मार्केटमध्ये रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य पसरत असून अनेक ठिकाणचे दिवे आणि सीसीटीव्ही यंत्रणा बंद अवस्थेत आहेत. परिणामी चोरीच्या घटनांना खतपाणी मिळत असल्याचा आरोप बाजारातील घटकांनी केला आहे.

दररोज लाखो रुपयांची आणि हंगामात कोट्यवधी रुपयांची उलाढाल करणाऱ्या या बाजारपेठेत शेकडो शेतकरी आणि व्यापाऱ्यांची वर्दळ असते. मात्र सुरक्षेच्या मूलभूत सुविधांचाच अभाव असल्याने बाजार समितीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विविध शुल्क आकारूनही आवश्यक सुविधा उपलब्ध होत नसल्याची खंत व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

मार्केट परिसरातील अनेक दिवे बंद असल्याने रात्री संपूर्ण परिसर काळोखात बुडतो. या परिस्थितीचा फायदा घेत चोरटे सक्रिय होत असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. दुसरीकडे सीसीटीव्ही यंत्रणा बंद असल्याने चोरीच्या



घटनांचा तपास करणेही अवघड बनले आहे. त्यामुळे व्यापारी व शेतकऱ्यांच्या मालमत्तेच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

याशिवाय बाजार परिसरातील स्वच्छतेच्या समस्येकडेही दुर्लक्ष होत असल्याची तक्रार आहे. शेतकरी आणि व्यापाऱ्यांच्या हितासाठी स्थापन झालेल्या संस्थेनेच त्यांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष केल्याची भावना बाजार परिसरात व्यक्त होत आहे.

चोरीच्या घटना वाढत असताना, सीसीटीव्ही बंद असताना आणि संपूर्ण मार्केट अंधारात बुडालेले असताना बाजार समितीकडे कोणती ठोस कृती योजना आहे? शेतकरी व व्यापाऱ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काचा वापर नेमका कुठे होतो? सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी कोणाची? आणि एखादी अनुचित घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार? असे प्रश्न आता जोर धरू लागले आहेत.मात्र सचिवांच्या या उत्तरामुळे बाजारातील संताप आणखी वाढला आहे. सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असताना दुरुस्तीची कोणतीही कालमर्यादा सांगता येत नसल्याने बाजार समितीच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे विंचूरसारख्या महत्त्वाच्या कांदा बाजारपेठेतील समस्यांकडे बाजार समिती नेमके कधी गांभीर्याने पाहणार, असा सवाल व्यापारी व शेतकरी वर्गातून उपस्थित केला जात आहे.

**विंचूर कांदा मार्केटमधील बंद असलेले लाईट आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा प्रश्न गंभीरतेने घेतला आहे. संबंधितांना तातडीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पुढील दोन दिवसांत सर्व लाईट आणि सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक कामे पूर्ण करण्यात येतील. बाजारात येणाऱ्या शेतकरी, व्यापारी आणि हमालांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बाजार समिती कटिबद्ध आहे."**

**संदीप (ललित )दरेकर, उपसभापती, बाजार समिती**

**"मार्केटमधील काही लाईट आणि सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. त्यांच्या दुरुस्तीचे काम संबंधितांना देण्यात आले आहे. मात्र ते काम किती दिवसांत पूर्ण होईल, हे सध्या सांगता येणार नाही."**

**प्रतिक्रिया :-नरेंद्र वाढवणे, सचिव**

# आजच्या राजकारणात सिद्धांत मुल्ये, निष्ठा वैचारिकता हरवली आहे

आजच्या राजकारणात सिद्धांत, मूल्ये, निष्ठा आणि वैचारिक अधिष्ठानाचे स्थान लोप पावताना दिसत आहे. जनसेवा हे मुख्य ध्येय मागे पडून केवळ 'सत्तेचे व स्वार्थाचे राजकारण' उरले आहे. वैचारिकतेचा हा अभाव लोकशाहीसाठी अत्यंत घातक असून, सुजाण नागरिकांच्या जागरूकतेनेच ही स्थिती बदलू शकते.

१)- सत्तेचे राजकारण आणि आयाराम-गयाराम: स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काही दशकांत राजकारणात स्पष्ट विचारसरणी (उदा. समाजवाद, गांधीवाद, लोकशाही) पाहायला मिळत होती. मात्र, आता 'कोणत्याही मार्गाने सत्ता मिळवणे' हेच एकमेव उद्दिष्ट उरले आहे. राजकीय स्वार्थासाठी पक्ष बदलणे, एका रात्रीत निष्ठा बदलणे हे सर्रास सुरू आहे.वैचारीक व नैतिक राजकीय सिद्धांत स्वतः यांच्या स्वार्था पुढे क्षणंभर सुद्धा तग धरू शकत नाहीत अशी परिस्थिती सध्या राजकारणात निर्माण झाली आहे.पक्षनिष्ठा हि खेळण्यातील खुळखुळा झाली आहे.विभिन्न विचार असले तरी स्वार्थासाठी एकरूप होणारी वृत्ती राजकारणात सध्या झपाट्याने वाढत आहे. नितिमुल्य शुन्य राजकारणी सत्तेच्या चाव्या आपल्या हातात ठेवण्यासाठी कोणत्याही थराला जाऊन स्वार्थ साधण्यासाठी वैचारिक तडजोडी करत आहेत.



२)- समाजकारणाचा विसर: पूर्वीचे राजकारण हे समाजकारणाचे माध्यम होते. नेत्यांमध्ये जनहिताची तळमळ असायची. आजच्या काळात राजकारण हा एक नफ्याचा व्यवसाय बनला आहे. योजनांमधील भ्रष्टाचार, घराणेशाही आणि स्वतःचे खिसे भरणे याकडेच अनेक राजकारण्यांचा कल असतो. हवे तशे उद्योग धंदे करण्यासाठी हवी तशी तडजोड करण्याची वृत्ती वाढत आहे.अशा वृत्तीमुळे मुळ सिद्धांत वैचारीकता व निष्ठा ही लोप पावत चालली आहे.राजकारण्यानां सामाजिक बांधिलकीचा विसर पडला आहे.

३)- सत्तेसाठी संकुचित अस्मितेचा वापर: वैचारिक मुद्द्यांवर (उदा. शिक्षण, रोजगार, आरोग्य, विकास) निवडणूक लढवण्याऐवजी धर्म, जात, भाषा आणि प्रादेशिक भावना भडकवून मते मिळवली जातात. यामुळे समाजात फूट पडते आणि देशाचा मूळ विकास भरकटतो.मोठ्या प्रमाणावर जातीय दंगली सत्तेसाठी ठरवुन घडवुन आणल्या जातात. विकास, प्रगती,शेती विषयक धोरण, बेरोजगारी निर्मूलन, रोजगार निर्मिती, सामाजिक समन्वय या सारख्या अनेक बाबी बाजूला सारून फक्त सत्तेवर टिकवून राहण्यासाठी वाटेल तशा तडजोडी करण्यात येत आहेत.सत्तेसाठी संकुचित वृत्ती वाढत आहे.

४)- वैचारिक शून्यता आणि गुन्हेगारीकरण: राजकारणातील गुन्हेगारीकरण वाढीस लागले आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमीचे लोक जेव्हा सत्तेत येतात, तेव्हा तेथील विचारसरणी व नीतिमत्ता पूर्णपणे नष्ट होते. पैशाच्या आणि बाहुबलाच्या जोरावर निवडणुका जिंकल्या जात असल्याने, सामान्य व अभ्यासू कार्यकर्त्यांना राजकारणात संधी मिळणे कठीण झाले आहे.अशा गढुळ राजकीय वातावरणामुळे वैचारिक बांधिलकी असलेले विचारवंत व सामाजिक कार्यकर्ते राजकारणाकडे वळत नाहीत. त्यामुळे सामान्य माणसाला लवकर न्याय मिळत नाही.

५)- उपायांची आवश्यकता (मार्ग): हरवलेले राजकारण पुन्हा वैचारिक मार्गावर आणण्यासाठी खालील पावले उचलणे गरजेचे आहे:

सुशिक्षित तरुणांचा सहभाग:- राजकारणात उच्चशिक्षित आणि चारित्र्यवान तरुणांचा विचारवंताचा प्रवेश आवश्यक आहे.

मतदारांची जागरूकता:- मतदारांनी जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन विकासशील,राष्ट्रनिष्ठ, सामाजिक बांधिलकी असलेले कार्यकर्ताव त्याच्या.कार्याचे व विचारांचे मूल्यमापन केले पाहिजे.

पारदर्शकता आणि कायदा:- राजकीय पक्षांमध्ये लोकशाही असावी आणि भ्रष्ट नेत्यांवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी. पक्षनिष्ठेसोबत वैचारिक बांधिलकी जोपासण्यासाठी कठोर नियमावली लागू करण्यात आली पाहिजे. पक्षांतर बंदी कायदा अधिक बळकट करणारे धोरण निवडणूक आयोग हा स्वतंत्र निर्णयक्षम असणे आवश्यक आहे. निवडणूक संबंधित कारवाई वर तात्काळ निर्णय होणे गरजेचे आहे. विनाकारण कोर्टात हे प्रकरण वर्षानुवर्ष प्रलंबित राहिले नाही पाहिजे.


राजकारण ही समाजाला दिशा देणारी व्यवस्था आहे. जर राजकारणातून विचार, मुल्य आणि सिद्धांत हरवले तर, लोकशाहीचा अस्त होईल, समाज दिशाहीन होईल. देशाच्या भल्यासाठी सत्तेच्या राजकारणापेक्षा तत्त्वनिष्ठ समाजकारणाची आज नितांत गरज आहे...

**लेखक**
**डॉ राजेंद्र मुरलीधर सानप**
**सदस्य, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ.**
**इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड बीड**
**मो. नं.- ९४२००१९५९७**

## रा. आ. पोदार आयुर्वेद महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त 'योग सप्ताह' उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**मुंबई किशोर गुडेकर, जिल्हा प्रतिनिधी प्रमुख** : आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त रा. आ. पोदार वैद्यक महाविद्यालय (आयुर्वेद), वरळी, मुंबई येथे १५ जून ते २० जून २०२६ या कालावधीत 'योग सप्ताह' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार आयोजित या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये योगाचे महत्त्व, निरोगी जीवनशैली आणि मानसिक-शारीरिक आरोग्याविषयी जनजागृती करणे हा आहे.







महाविद्यालयाच्या अधिष्ठाता मा. डॉ. संपदा संत यांच्या मार्गदर्शनाखाली योग सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाच्या योग सप्ताहाची संकल्पना "Yoga for Wellness, Wisdom and World Peace" अशी असून, प्रत्येक विभागाने या विषयाशी संबंधित विविध उपक्रमांचे नियोजन केले आहे.

विद्यार्थ्यांनी योगाच्या माध्यमातून निरोगी जीवन, मानसिक संतुलन, वृद्धापकाळातील आरोग्य संवर्धन आणि सामाजिक स्वास्थ्य यावर आधारित आकर्षक व संदेशात्मक चित्रे सादर केली. स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. मा. डॉ. संपदा संत (अधिष्ठाता), मा. डॉ. मिलिंद निकुंभ (विभाग प्रमुख, रचना शारीर विभाग), मा. डॉ. गुरुनाथ खानोलकर (सहयोगी प्राध्यापक), मा. डॉ. किशोर कुमार मडावी (सहयोगी प्राध्यापक), डॉ. पूजा शर्मा (सहाय्यक प्राध्यापक) आणि डॉ. कुमता माळी (सहाय्यक प्राध्यापक) यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

यावेळी श्री राहुल जाधव, श्री नंदकुमार निवाते, श्री राहुल जानराव तसेच रचना शारीर विभागातील सर्व पदाधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना योगाचा दैनंदिन जीवनात अवलंब करण्याचे आवाहन करत योगामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्थैर्य आणि सकारात्मक जीवनदृष्टी विकसित होत असल्याचे सांगितले.

योग सप्ताहांतर्गत पुढील काही दिवस योग प्रात्यक्षिके, व्याख्याने, जनजागृती कार्यक्रम, स्पर्धा आणि सामूहिक योग सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी जीवनशैलीची जाणीव निर्माण करून "निरोगी व्यक्ती, निरोगी समाज आणि शांततामय विश्व" हा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्याचा महाविद्यालयाचा प्रयत्न आहे.

रा. आ. पोदार वैद्यक महाविद्यालयाचा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून, योग संस्कृतीचा प्रसार आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

## मुदगल जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे** : पाथरी / तालुक्यातील मुदगल येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला नवीन प्रवेश घेतलेल्या चिमुकल्यांचे स्वागत मोठ्या उत्साहात शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला तसेच नवीन चिमुकल्यांचे स्वागत करण्यात आले यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन त्यांचे शाळेतील पहिले पाऊल गोड केले आणि त्यांना पूढील उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि



पटसंख्या वाढविण्यासाठी पालकांनी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले या कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते विद्यार्थ्यांचे मन रमवण्यासाठी संपूर्ण शाळा परिसर रंगीबेरंगी फुलांच्या माळा.आणि फुग्याने सजविण्यात आले होते यावेळी मुदगल जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री बोबडे शिक्षक कराळे . खंरे . यादव . वाघमारे . गायकवाड. लाडाणे या सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले यावेळी सरपंच लक्ष्मीकांत तिडके यांची उपस्थिती होती यासह पालक माता मोठ्या संख्येने उपस्थित होते

## स्मार्ट मीटरविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस आक्रमक; प्रक्रिया थांबविण्याची महावितरणकडे मागणी

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित** : स्मार्ट वीज मीटर बसविण्याच्या सुरू असलेल्या प्रक्रियेबाबत नागरिकांमध्ये असलेल्या शंका आणि भीतीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महावितरणच्या श्रीवर्धन शाखेकडे निवेदन सादर केले आहे. नागरिकांच्या मनातील संभ्रम दूर होईपर्यंत स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

शासनाच्या निर्देशानुसार जुन्या वीज मीटरच्या जागी स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सुरू आहे. मात्र, स्मार्ट मीटरमुळे वीजबिलामध्ये वाढ होण्याची शक्यता



असल्याची भावना अनेक नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे महावितरणने प्रथम नागरिकांना या योजनेची सविस्तर माहिती देऊन त्यांच्या शंकांचे निरसन करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

मीटर बदलण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी जुन्या मीटरचे रीडिंग, त्याची स्थिती तसेच बदलापूर्वी आणि बदलानंतरची छायाचित्रे यांची नोंद ठेवण्यात यावी, अशी सूचनाही निवेदनात करण्यात आली आहे. भविष्यात वीजबिल किंवा मीटरबाबत कोणतेही वाद निर्माण होऊ नयेत, यासाठी योग्य पद्धतीने प्रक्रिया राबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

महावितरण प्रशासनाने नागरिकांच्या प्रश्नांना योग्य उत्तर देऊन स्पष्ट भूमिका जाहीर करावी. अन्यथा श्रीवर्धन तालुक्यातील नागरिक, कार्यकर्ते आणि विविध सामाजिक संघटनांच्या माध्यमातून लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने देण्यात आला आहे.स्मार्ट मीटर योजनेबाबत महावितरण प्रशासन पुढील काळात कोणती भूमिका घेते, याकडे श्रीवर्धनमधील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## अभिमानास्पद! देवद गाव पनवेल येथील तरुण सैन्य दलात निवड; शिवसेना (उबाठा) पक्षाच्या देवद शाखे तर्फे सत्कार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या देवद शाखे तर्फे उपविभाग प्रमुख जयंत पाखरे यांनी आयोजन केले सैन्यात जाण्याचे, देशासाठी काहीतरी करण्याचे लाखो तरुणांचे स्वप्न असते. यासाठी अनेकजण जीव तोडून मेहनत करतात. सैन्यातील भरतीसाठी दिवसरात्र सराव, अभ्यास करतात. असाच सराव देवद येथील तरुणांनी केला आणि त्यांची निवड भारतीय सैन्य दलात झाली आहे.

रायगड जिल्हा प्रमुख दिपक निकम यांनी शाल व पुष्पुच्छ देऊन सुजल विनोद मोरे या सैनिकाचा सत्कार केला. देशसेवा हीच खरी भक्ती आहे. मातृभूमीच्या रक्षणासाठी




घेतलेला हा धाडसी निर्णयवर मार्गदर्शन केले. या वेळी मान्यवर डॉ. सेल चे राज्य उप उपाध्यक्ष डॉ.आशिष बांदेकर, तालुका सन्यवक शिवाजी पालांडे, पनवेल प्रभाग संघटक सिद्धेश चव्हाण, महिला संघटक तनुजा झुरे यांची उपस्थिती लाभली. आई शिल्पा मोरे वडील विनोद मोरे यांचे सहकार्य लाभले होते. नियमित प्रशिक्षण, शिस्तबद्ध व्यायाम व अभ्यासामुळे हे यश शक्य झाल्याचे सुजल विनोद मोरे यांनी सांगितले सुजल मोरेची सैन्य दलात निवड झाल्याने या यशाबद्दल गुरुदत्त माया सोसायटीतील पदाधिकारी अध्यक्ष विनायक काटकर, सेक्रेटरी देवराम खंदारे, उप सेक्रेटरी अन्वर शेख यांच्या कडून कौतुक व्यक्त करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला उपस्थित देवद शाखेचे शाखा प्रमुख अर्जुन व्हटकर,उप शाखा प्रमुख दिपक दळवी,संजय घाणेकर, योगेंद्र यादव, निलेश आपटे, हितेंद्र सोलकर, ऋतिक टावरी ,विचुंबे शाखेचे विभाग प्रमुख विशाल भोईर, ऋषब मोहिते, सुकापुर शाखेचे शाखा प्रमुख हनुमंत खंडागळे, गणेश जगदाळे विनोद कदम, पुरुषोत्तम पाटील या सर्वांनी सैनिकाची निवड खरोखरच कौतुकास्पद आहे.

## आठ दिवसात शिक्षक द्या अन्यथा शाळेला कुलूप ठोकणार मा.सरपंच विष्णू वनवे

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे** : विद्यार्थ्यांच्या स्वागताचे इव्हेंट संपले असेल तर याकडे लक्ष द्या वनवेवाडी जि.प.प्रा. शाळेत एकच शिक्षक आठ दिवसात शिक्षक द्या अन्यथा शाळेला कुलूप ठोकणार - मा. सरपंच विष्णू वनवे दि.१५ जुन रोजी जि.प.शाळेत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले, गणवेश , पाठ्यपुस्तके वाटप केली . हा इव्हेंट शिक्षण विभागाने सक्तीचा केला होता अनेक ठिकाणी राजकीय पुढाऱ्यांनी बडाजाव करत.. मोठमोठे आश्वासने दिली. जि. प. शाळेत पालकांनी मुलांना पाठवावे असा आग्रह धरला जातो स्वागताचे इव्हेंट संपले असेल तर आता पायाभूत सुविधांकडे लक्ष देणे आवश्यक आहे.अन्यथा शिक्षण प्रेमी शिक्षण विभागाला घेरल्याशिवाय राहणार नाहीत हे निश्चित आहे..



तालुक्यातील वनवेवाडी येथील जि.प.प्रा.शाळेत इ.१ ली ते ४ थी पर्यंत ३८ विद्यार्थी शिक्षणाचे धडे गिरवत आहेत. विद्यार्थी पटसंख्येनुसार दोन शिक्षक कार्यरत असणे आवश्यक आहेत.गेल्या एक वर्षापासून एक पद रिक्त आहे. सध्या

एका शिक्षकावर संपूर्ण जबाबदारी आल्याने ताण वाढला आहे.इ १ ली ते ४ थी वर्गातील विद्यार्थ्यांना अध्यापन करावे लागत आहे. या सह निवडणूक विभाग, जनगणना, शैक्षणिक बैठका या अवांतर कामामुळे विद्यार्थ्याकडे लक्ष देणे शक्य होत नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होऊ लागले आहे शासन एकीकडे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीने पावले उचलत असल्याचे सांगत आहे परंतु दुसरीकडे एकाच शिक्षकावर सर्व जबाबदारी दिल्याचे दिसून येत आहे त्यामुळे सदरील शाळेत शिक्षण घेणाऱ्या 38 विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत असल्याने अखेरीस गावातील जागृत नागरिकांनी दि१७ रोजी आष्टी येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालय गाठून गटशिक्षण अधिकाऱ्यांना तातडीने शिक्षक उपलब्ध करून देण्याची लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे. आठ दिवसात शिक्षक उपलब्ध न झाल्यास शाळेला कुलूप ठोकण्यात येईल असा इशारा मा. सरपंच विष्णू वनवे यांच्यासह बाळासाहेब वनवे, विष्णु रावसाहेब वनवे, जयरिंग नाना माने , पोपट सिताराम बनसोडे,अंकुश साहेबराव वनवे , रामदास वनवे, अंबादास दशरथ बांगर संजय भाऊसाहेब वनवे, विठ्ठल सुभाष वनवे, रावसाहेब नाना बांगर आदि ग्रामस्थांनी निवेदनावर सह्या केल्या आहेत.

## महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टच्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : आयएसओ नामांकन प्राप्त व नीती आयोग नोंदणीकृत एनजीओ महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त ढोकणे भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

याप्रसंगी ज्येष्ठ मार्गदर्शक अण्णासाहेब अढाउकर, खरेदी-विक्री संस्थेचे सभापती गजानन जाधव, रमेश अण्णा यावतकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय गणोरकर, प्राचार्य भास्कर जावरकर, अरुण ढोकणे, प्राचार्य दत्तात्रय रेवस्कर, ज्येष्ठ विश्वस्त दिनकर मावंदे, कृषी अधिकारी राजकुमार अडगोकार, रमेश कांडलकर, सुरेश अडोकार, श्रीधर पवार, डॉ. रमेश शेवतकर, चंद्रशेखर आजनकर, डॉ. सुरेश दिघडे, रामेश्वर धनोकार, अंबादास जावरकर आदी मान्यवर उपस्थित होते.




कार्यक्रमात सर्वसाधारण सभेचे प्रास्ताविक प्रमुख विश्वस्त प्राचार्य निळकंठ बोरोळे यांनी केले. सूत्रसंचालन मुख्य संयोजक प्रदीप लांडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन रवींद्र ढोकणे यांनी केले.

वर्धापन दिनानिमित्त वंचित विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचा नागपूरचे लेखक मनोहर चलपे लिखित 'मी सावित्री – माझी कर्म कहाणी' हे विचारपुष्प पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विश्वस्त गजानन करुले, हरिदास कविटकर, नंदकिशोर मेहरे, चक्रधर पवार, प्रा. प्रवीण नवले, ॲड. सौरभ दिघडे, रत्नाकर करुले, गजानन येंगळे, सुजल खवले, प्रा. अमोल कोरडे, योगेश भेलकर, भानुदास मावळे, प्रा. मंगेश काळे, अमोल राऊत, प्रा. प्रवीण हाडोळे, राधेश्याम निमकर, सुनील अंबाळकर, उज्वल लहाने, जगदीश लहाने, योगेंद्र लहाने, देवानंद भडांगे, देवानंद जावरकर, गजानन मेहरे, भानुदास मावळे यांनी विशेष सहकार्य केले.

यावेळी भाजपा नेते गोपाल चंदन यांचा वाढदिवसानिमित्त भाजपाचे तालुकाध्यक्ष मदन पाटील बायस्कर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व विचारपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. तसेच विविध राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते आणि ट्रस्टच्या विश्वस्तांनी कार्यक्रमाला भेट देऊन समाधान व्यक्त केले.

# कल्पतरू जलतरण स्पर्धेत चिमुरड्यांचा डंका; उत्कृष्ट कामगिरीने इतर पोहणाऱ्यांनीही जिंकली मने!



**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : गोंदिया कल्पतरू चॅरिटेबल ट्रस्ट आणि बाहेकर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने 'कल्पतरू स्विमिंग स्पर्धा २०२६/२७' अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे पार पडली. नागरा येथील अत्याधुनिक कल्पतरू स्विमिंग पूलमध्ये आयोजित या स्पर्धेत चिमुरड्यांपासून ते तरुणांपर्यंत सर्वच वयोगटातील तैराकांनी आपल्या कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. दीपक बाहेकर आणि डॉ. गार्गी बाहेकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण व पूजन करून करण्यात आली. यावेळी प्रास्ताविक करताना डॉ. दीपक बाहेकर म्हणाले की, "मुख्य प्रशिक्षक शिव नागपुरे यांच्या अविरत प्रयत्नांमुळे या जलतरण स्पर्धेचे हे सलग ५ वे यशस्वी वर्ष आहे. २०१८/१९ मध्ये सुरू झालेला हा स्विमिंग पूल अत्याधुनिक ऑटोमॅटिक हायजीन फिल्टरेशन प्रणाली, सॉना बाथ, स्टीम बाथ, आधुनिक जिम, निसर्गरम्य योगा प्लॅटफॉर्म आणि ग्रीन वॉकिंग ट्रॅक अशा सर्व सोयींनी सज्ज आहे."

दिमाखदार उद्घाटन सोहळा

गोंदियाचे नगराध्यक्ष सचिन शेंडे, नागराचे माजी सभापती व जि.प. सदस्य रमेश लिल्हारे, माजी जि .प. सदस्य कुंदन कटारे, इंजि. राजीव ठकरेले, डॉ. प्रशांत कटरे, व्यापारी असोसिएशनचे सरचिटणीस राजा इसरका, पं.स. सदस्या नंदिनी लिल्हारे यांच्यासह पंकज अग्रवाल, सीमा अग्रवाल, मुन्नालाल यादव, सुधीर राठोड, इंजि. सुधीर नायर, ॲड. अंजली व राजेश चौरे, पदम अग्रवाल, संजय नागपुरे, ओशिता जैन, रानू ठाकूर, राधिका इसरका, अमित अग्रवाल, पूजा अग्रवाल, प्रीती अग्रवाल, डॉ. चैताली सोमाणी आदी मान्यवरांच्या हस्ते रिबन कापून स्पर्धेचे रीतसर उद्घाटन करण्यात आले.

स्पर्धेचा निकाल आणि विजेते खेळाडू:

स्पर्धेत विविध वयोगटांत चुरशीची लढत पाहायला मिळाली. विजेत्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत:

**७ ते ९ वर्षे वयोगट (मुले व मुली)**

भव्य मुस्कान इसरका: ऑलराउंडर कामगिरी करत फ्री स्टाईल, ब्रेस्ट स्ट्रोक आणि अंडरवॉटर स्विमिंगमध्ये प्रथम क्रमांक.

संस्कार महेश बडगे (द्वितीय), हृदय अमित ठवरे (तृतीय).

अंडर वॉटर प्रकार: कियांश प्रशांत चामट आणि त्रियांश अजय कावडे (संयुक्त तृतीय).

मुली: नायरा राजकुमार लिल्हारे (प्रथम), हिमांशी गौरव मेठी (अंडर वॉटर आणि ब्रेस्ट स्ट्रोकमध्ये प्रथम), श्रेया राहुल ठाकूर (तृतीय).

**१० ते १२ वर्षे वयोगट (मुली)**

फ्री स्टाईल: जीनल चंचल अग्रवाल (प्रथम), प्रेरणा ओमप्रकाश नागपुरे (द्वितीय), मानवी पदम अग्रवाल (तृतीय).

**१३ ते १५ वर्षे वयोगट (मुली)**

फ्री स्टाईल: पूर्वी विवेकानंद पंचबुद्धे (प्रथम), नव्या हेमंत अग्रवाल (द्वितीय), खुशी अभिषेक अग्रवाल (तृतीय).

ब्रेस्ट स्ट्रोक: खुशी अभिषेक अग्रवाल (प्रथम), नव्या हेमंत अग्रवाल (द्वितीय), पूर्वी विवेकानंद पंचबुद्धे (तृतीय).

**१० ते १३ वर्षे वयोगट (मुले)**

फ्री स्टाईल: अध्यात्म/नमन प्रशांत चामट (प्रथम), संकेत कृष्णा अग्रवाल (द्वितीय), ईशान अंकित अग्रवाल (तृतीय).

ब्रेस्ट स्ट्रोक: ईशान अंकित अग्रवाल (प्रथम), संकेत कृष्णा अग्रवाल (द्वितीय), अथर्व सतीश पाटील (तृतीय).

अंडर वॉटर: अथर्व नितीन सोमाणी (प्रथम).

**१३ ते १५ वर्षे वयोगट (मुले)**

वैभव शिव नागपुरे: अद्वितीय ऑलराउंडर प्रदर्शन करत फ्री स्टाईल, ब्रेस्ट स्ट्रोक आणि अंडरवॉटरमध्ये प्रथम क्रमांक.

विराट राहुल ठाकूर (द्वितीय), पीयूष पंचबुद्धे (तृतीय). (पीयूषने अंडर वॉटर व ब्रेस्ट स्ट्रोकमध्येही द्वितीय स्थान मिळवले).

**१६ ते १८ वर्षे वयोगट (युवक)**

फ्री स्टाईल: प्रभव इसरका आणि मयूर लेकचंद धामडे (संयुक्त प्रथम).

ब्रेस्ट स्ट्रोक व अंडर वॉटर: मयूर लेकचंद धामडे (प्रथम), प्रभव इसरका (द्वितीय).

**१८ ते २१ वर्षे वयोगट (युवती)**

कु. आरजू लेकचंद धामडे (प्रथम) आणि कु. सायली लेकचंद धामडे (द्वितीय).

**गौरव आणि बक्षीस वितरण**

विजेत्या खेळाडूंना डॉ. पाली बग्गा, पुष्पक जस्सानी, डॉ. सचिन केलनका, डॉ. चैताली सोमाणी, सरला सोमाणी, शंकरलाल व किरण अग्रवाल (मोना टायर्स), मनीष टेकरीवाल, मोहित मुंदडा, अशोक लेकरिया, चंचल अग्रवाल, राहुल तिवारी, प्रशांत चामट, आकाश छितरका, टीना मेठी, अतुल सतदेवे, विकास चौरसिया, अमित छैलबिहारी अग्रवाल, चंदन अग्रवाल आणि घनश्याम ऊके यांच्या हस्ते गोल्ड मेडल, आकर्षक ट्रॉफी आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

सर्व वक्त्यांनी डॉ. दीपक बाहेकर यांचे आभार मानले आणि सांगितले की, या स्विमिंग पूलमुळे गोंदियातील हजारो मुले, युवक आणि वृद्ध उत्कृष्ट तैराकी शिकत असून आरोग्यासाठी हा सर्वोत्तम व्यायाम ठरत आहे.

**विशेष सहकार्य व आभार**

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लेकचंद धामडे, दीपक छुरा, सतीश पाटील, टीना गौरव मेठी, ओशिता जैन , रानू भालचंद्र ठाकूर, शीला नागपुरे, सोनाली ढेकवार, संजय नागपुरे, राजकुमार नागपुरे आणि राहुल ठाकूर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे बहारदार संचालन मुख्य प्रशिक्षक शिव नागपुरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन इंजि. सुधीर नायर यांनी मानले.

उपस्थितांसाठी स्वादिष्ट अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. सर्व विजेत्यांनी आपल्या यशाचे श्रेय पालकांना व प्रशिक्षकांना दिले.

---

**री-सस्टेनेबिलिटीचा पर्यावरणीय उपक्रम ईकोहब.इन**

## ईकोहब.इन भारताच्या हवामान आणि सर्क्युलर इकॉनॉमी इनोव्हेशन ईकोसिस्टमला समर्थ बनवतील

**दैनिक युवक आधार**

**मुंबई,प्रतिनिधी** : री-सस्टेनेबिलिटीच्या सामाजिक आणि पर्यावरणीय प्रभाव उपक्रम रेजिलियन्स ॲक्शन्सने ईकोहब.इन नावाचा एक स्टेबिलिटी-केंद्रित इनक्यूबेटर सुरू केला आहे, ज्याचा उद्देश हवामान आणि क्लिन-टेक, प्रदूषण व्यवस्थापन, संसाधन कार्यक्षमतेत, सर्क्युलर इकॉनॉमी आणि टिकाऊ नवोपक्रमांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रारंभावी स्टार्टअप्सना समर्थन देणे आहे. हा उपक्रम त्या स्टार्ट-अपसाठी तयार केला गेला आहे जे आयडिएशन टप्प्यापासून पुढे गेले आहेत आणि व्यावसायिक पातळीवर विस्तारासाठी तयार आहेत. त्यांच्याकडे कार्यशील मिनिमम व्हायबल प्रॉडक्ट (एमव्हीपी), समर्पित टीम आणि स्पष्टपणे परिभाषित केलेली बाजार संधी असणे गरजेचे आहे.मसूद मलिक, व्यवस्थापकीय संचालक - ग्रुप सीईओ, री सस्टेनेबिलिटी म्हणाले,"भारतातील शाश्वततेचा बदल



फक्त पायाभूत सुविधा द्वारे घडणार नाही. हा नवकल्पना, उद्यमशीलता आणि अशा कल्पनांवर चालेल ज्यांना मोठ्या प्रमाणावर लागू करून खऱ्या पर्यावरणीय आव्हानांना सोडवता येईल. ईकोहब. इन च्या माध्यमातून आपण एक असा प्लॅटफॉर्म तयार करत आहोत जो नवोन्मेष, स्टार्टअप्स, उद्योगातील नेते, गुंतवणूकदार, शिक्षणतज्ज्ञ आणि धोरणकर्त्यांना एकत्र आणेल आणि असे उपाय जलदगतीने पुढे नेईल जे व्यावसायिकदृष्ट्या व्यवहार्य, पर्यावरणाच्या दृष्टीने जबाबदार आणि मोजता येणारा परिणाम देण्यासाठी सक्षम असतील."

जसे-जसे भारत कमी-कार्बन, सर्कुलर आणि लवचिक अर्थव्यवस्थेकडे वेगाने सरकत आहेत, तस-तसे नवोन्मेषी शाश्वततेच्या उपायांची गरज आधीपेक्षा जास्त वाढली आहे. देशभरातील उद्योजक पर्यावरणीय आव्हानांवर उपाय करणाऱ्या नवीन तंत्रज्ञान आणि व्यवसाय मॉडेल्स तयार करत आहेत, पण मेंटरशिप, नॉन-इक्विटी इनक्यूबेटर फंडिंग, उद्योग भागीदारी, पायलट संधी आणि व्यवसाय पडताळणीपर्यंत मर्यादित प्रवेशामुळे त्यांना विस्तार करण्यात अडचणी येतात. ईकोहब.इन ची स्थापना या कमतरता दूर करण्यासाठी आणि उच्च क्षमतेच्या टिकाऊ उपक्रमांना असे स्केलेबल व्यवसायात रूपांतरित करण्यासाठी करण्यात आली आहे, जे मोजता येण्याजोगा पर्यावरणीय आणि सामाजिक प्रभाव निर्माण करू शकतील.

---

## शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल; इरशाद अहमद यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार!

### (विद्यार्थ्यांच्या घडणीत मोलाचा वाटा ; इरशाद अहमद यांना शिर्डीत राज्यस्तरीय सन्मान)

**दैनिक युवक आधार**

**रिसोड (प्रतिनिधी) रणजितसिह. ठाकूर** : शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले अथक प्रयत्न आणि शैक्षणिक व सहशालेय कार्यातील उत्कृष्ट सेवेची दखल घेत रिसोड शहरातील डॉ अल्लामा इकबाल उर्दू प्रायमरी स्कूलचे शिक्षक इरशाद अहमद मुशताक अहमद यांना यंदाचा मानाचा 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले आहे. 'बी दि चेंज फाउंडेशन' (शिर्डी, जिल्हा अहिल्यानगर) संस्थेच्या वतीने आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना हा गौरव प्रदान करण्यात आला.




दिग्गजांची सोहळ्याला उपस्थिती संस्थेच्या वतीने आयोजित या पुरस्कार सोहळ्याच्या (पर्व ४ थे) मुख्य कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तींनी प्रमुख पाहुणे म्हणून हजेरी लावली होती. यामध्ये निवृत्त मेजर कर्नल सुभेदार दिनकर रतन पवार, सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री निविदिता पगारे, डॉ. प्रकाश कोडपे, बाबासाहेब कापे आणि दादासाहेब ढोकचवडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते इरशाद अहमद मुशताक अहमद यांना सन्मानपत्र आणि स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

अथक परिश्रम आणि समर्पणाचा गौरव इरशाद अहमद यांनी शिक्षण क्षेत्रात व अल्पसंख्याक समाजासाठी केलेले कार्य अतिशय प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम आणि त्यांची निष्ठा अनेक विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरली आहे. "हा सन्मान म्हणजे शिक्षकांच्या कार्याचा, अस्मितेचा आणि स्वाभिमानाचा गौरव आहे," अशा भावना यावेळी आयोजकांनी आणि उपस्थितांनी व्यक्त केल्या.इरशाद अहमद यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल शाळेचे अध्यक्ष प्राध्यापक मो. कबीर मोहसिन सरांनी शुभेच्छा दिल्या. शिक्षण क्षेत्रासह सर्वच स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

---

## मुरुडमध्ये ट्रॅव्हल्स बसचा धुमाकूळ ; वाहतूक कोंडीत नागरिक हैराण

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी** : मुरुड येथील मुख्य लातूर-बार्शी रोडवर सायंकाळपासून मध्यरात्रीपर्यंत खासगी ट्रॅव्हल्स बसचालकांचा अक्षरशः धुमाकूळ सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. प्रवासी घेण्यासाठी अनेक ट्रॅव्हल्स बस थेट रस्त्याच्या मधोमध उभ्या केल्या जात असल्याने वाहतुकीची मोठी कोंडी होत असून नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, ट्रॅव्हल्स बस चालक व कर्मचारी प्रवाशांच्या प्रतीक्षेत वाहन बराच वेळ मुख्य रस्त्यावरच थांबवतात. त्यामुळे दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनांच्या रांगा लागून संपूर्ण वाहतूक विस्कळीत होते. विशेषतः सायंकाळी आणि रात्रीच्या वेळी ही समस्या अधिक गंभीर बनत आहे.

या प्रकारामुळे केवळ



वाहतूक कोंडीच नव्हे तर अपघाताचा धोकाही वाढला आहे. नागरिकांनी अनेकदा याबाबत तक्रारी करूनही संबंधित प्रशासन आणि वाहतूक विभागाकडून प्रभावी कारवाई होत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, बुधवारी सायंकाळी वाहतूक कोंडीमुळे एका ॲम्ब्युलन्सलाही काही काळ अडथळ्यांचा सामना करावा लागल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली. रस्त्याच्या मधोमध उभ्या असलेल्या ट्रॅव्हल्स बसमुळे मार्ग अरुंद झाल्याने ॲम्ब्युलन्सला पुढे जाण्यास अडचण निर्माण झाली होती. अखेर काही स्थानिक युवकांनी हस्तक्षेप करून संबंधित चालकाला समज दिल्यानंतर रस्ता मोकळा करण्यात आल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

नागरिकांच्या मते, काही ट्रॅव्हल्स चालकांकडून नियमांना हरताळ फासून मनमानी सुरू असून यामुळे सर्वसामान्य वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. "रस्त्याच्या मधोमध बस उभी करून प्रवासी घेण्याची प्रथा थांबली नाही तर भविष्यात मोठी दुर्घटना घडू शकते," अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

मुरुड बसस्थानक परिसर, मुख्य चौक आणि लातूर-बार्शी रोडवर वाहतूक नियंत्रणासाठी विशेष मोहीम राबवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ट्रॅव्हल्स बसचालकांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

---

## इरफान ने दाखवून दिले मानवता हाच खरा धर्म जात ना धर्म फक्त माणुसकी:- ॲड.जब्बार पठाण

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा(प्रतिनिधी)** : महाराष्ट्रातील माळशिरस तालुक्यामधील तांदुळवाडी येथे पिकअप टेम्पो रस्त्याच्याकडेला विहिरीमध्ये कोसळून १४ जणांपैकी ८ जणांचा मृत्यू झाला. ज्या ६ जणांना वाचवले आहे त्यामध्ये एक चार वर्षाचा मुलगा आहे. या घटने जवळून जाणाऱ्या ज्या व्यक्तीने प्रसंगावधान साधत त्यातील चार वर्षाच्या मुलाला व इतर चार जणांना वाचवले आहे त्याचे नाव आहे इरफान. अर्थातच हा मुस्लिम तरुण आहे. त्याने पीडित हे कोणत्या धर्माचे आहेत त्यांची पार्श्वभूमी काय याची पर्वा न करता विहिरीमध्ये उडी घेत चार वर्षाच्या मुलाला वाचवले. दुसरे असेच उदाहरण हे उत्तराखंड मधील जिम ट्रेनर दिपक कुमार याचे जाने वकील अहमद या दुकान विक्रेत्याला जातीयवादी संघटना च्या लोकांच्या हल्ल्यापासून वाचवले. हे दोघेही तरुण भारतीयत्वाची खरी ओळख आहेत. ते भारताचा वारसा चालवत आहेत त्यांच्या कडे घरी गंगा जमुना तहजीब आहे. त्या दोघांसारखे भारतातील तरुणांनी बनले पाहिजे. रस्त्याच्या कडेने कठडे नाहीत, विहिरी आहेत, तलाव आहेत त्यांना कठडे नाहीत, खड्डे आहेत या कशाचीही जबाबदारी सरकार घेत नाही. कंत्राटदारांच्या भल्यासाठी नवीन नवीन कर्ज काढून शक्तीपीठ महामार्गासारखे रस्ते तयार करण्यात महायुती सरकार व्यस्त आहे. महाराष्ट्रात व भारतामध्ये सातत्याने मुस्लिम कुटुंबांच्या वर शंकेने व द्वेषाने पाहिले जाते व त्यांच्यावरती अनेक वेळा हल्ले देखील होतात. लव जिहाद अमुक जहा तमुक जिहाद अशी सतरा कारणे काढून तरुणांना भडकवून त्यांच्या मशिदीसमोर तलवारी नाचवल्या जातात. या कशाचीही परवा न करता माणुसकी ही सर्वश्रेष्ठ मानत इरफानने विहिरीमध्ये उडी घेत त्या पिकअप टेम्पो मधील विहिरीत पडलेल्या लोकांना वाचवले. यातून सर्व भारतीयांनी बोध घेण्याची गरज आहे. केवळ राजकारणासाठी आदानी, अंबानी यांची तिजोरी भरण्यासाठी लोकांच्या रोज-रोटीच्या प्रश्नांच्या कडे लक्ष जाऊ नये आपली सत्ता राहावी या साठी जातीयवादी संघटना व त्यांच्या परिवार संघटना जातीयवादी संघटनानी हिंदू, मुस्लिम द्वेष वाढवला आहे. हिंदू असतील किंवा मुस्लिम असतील किंवा ख्रिश्चन, दलित सर्वच धर्मातील सर्वसामान्य लोकांनी समजून घेणे गरजेचे आहे की त्यांच्या धर्मातील मूल तत्त्वादी कट्टर धर्मांध हे आपला धर्म श्रेष्ठ व दुसरा धर्माच्या व्यक्तीमुळे आपला धर्म खतरे मे है असं मांडणी सेट करत असतात याला कोणती भीक न घालता आपण शेवटी एकमेकांना अडचणीच्या वेळी धावून जाणार आहोत या साठी मानवता हाच श्रेष्ठ धर्म आहे. बाकीचे द्वेषाच राजकारण करतात त्यांना सत्ता हवी आहे पैसा हवा आहे माणुसकी टिकवली तर त्यांच्या राजकारणाला शह देता येईल. आपल्या सर्वांच्या मध्ये इरफान लपले आहेत, त्यांना जपून ठेवा त्यांना मुक्त करा असे अनेक इरफान तयार होतील हे पहा, भारतातील अनेक ठिकाणी जातीय तेढ निर्माण करण्याचं षडयंत्र चालू आहे, दिल्लीच्या घटनेत हॉटेल मधील मुस्लिमांनी अनेक हिंदू बांधवांचे जीव वाचवले पण एक ही जातीयवादी संघटनेचा कार्यकर्त्यांकडून कसलीही प्रतिक्रिया देण्यात आली नाही, चागल्या कामांना शाब्बासकी मिळायलाच पाहिजे मग ते हिंदू बांधवाकडून होवो नसता मुस्लिम बंधूकडून होवो, पण हे आज काल होताना दिसत नाही भारतातील शांतता अबाधित रहावी म्हणून हिंदू, मुस्लिम, दलित, शीख त्या त्या समाजातील युवकांनी पुढ येऊन सामाजिक सलोखा घडवून आणला पाहिजे, धार्मिक संघटनेला कुठ तरी कायद्याचा धाक देण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन येणाऱ्या संकटाचा मुकाबला करायला आज ची पिढी पुढ का येत नाही याचा बोध घेऊन पोलिस प्रशासनाने विचार करायला पाहिजे, मागील अनेक वर्षा पासून पोलिस प्रशासन बघ्याची भूमिका घेत आहे जर गृह खात्याने ठरवलं तर खूप काही देशात बदल होऊन हिंदू, मुस्लिम एकोपा राहील परंतु का कुणास ठाऊक या कामांना प्राधान्य का देण्यात येत नाही, देशातील जातीय वातावरण बघितल तर खूप भयंकर परिस्थिती निर्माण झालेली असताना वातावरणात का बदल होताना दिसत नाही, आज च्या युवकांना शिक्षणाशिवाय पर्याय नाही त्या मुळे युवकांनी जातीयवादी किड्याकडे लक्ष न देता अभ्यासाकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे.